




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १३८ * नांदेड * सोमवार, दि. २५ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये

## कृषी विद्यापीठाची सूचना



**मुंबई (प्रतिनिधी)** –कडाक्याच्या उन्हाचा चटका सहन करणाऱ्या राज्यातील जनतेसाठी आणि बळीराजासाठी मोठी बातमी समोर येत आहे. येत्या २९ मेपर्यंत राज्यात मान्सूनपूर्व पाऊस पडण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आला आहे. यंदा नैऋत्य मोसमी वारे अत्यंत वेगाने पुढे सरकत असल्याने मान्सून महाराष्ट्रात नेहमीच्या वेळेपेक्षा काही दिवस आधीच दाखल होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मान्सून लवकर येत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी पेरणीबाबत शेतकऱ्यांनी अजिबात घाई करू नये, असा महत्त्वपूर्ण इशारा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी दिला आहे. जोपर्यंत शेतात किमान ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे त्यांनी म्हटले आहे. अपुऱ्या पावसावर पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढावू शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

हवामान शास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार यंदा मान्सूनची वाटचाल अत्यंत अनुकूल असून, जून महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा चांगल्या पावसाची शक्यता आहे. आगामी मान्सूनपूर्व पावसामुळे राज्यातील तापमानात मोठी घट होईल, ज्यामुळे नागरिकांना उष्णतेच्या लाटेपासून मोठा दिलासा मिळेल.

दरम्यान, मान्सूनपूर्व पाऊस हा अनेकदा वादळी स्वरूपाचा असतो. त्यामुळे राज्यातील काही भागांत जोरदार वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हा पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शेतात काम करताना किंवा बाहेर (पान ६ वर...)

## एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवारी अचानक दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. दिल्लीत ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. या भेटीचे नेमके कारण अद्याप समोर आले नसले, तरी ही भेट आगामी विधान परिषद निवडणुकीतील जागा वाटप आणि जागांची अदलाबदली याभोवतीच फिरत राहण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. आता यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने वरिष्ठ नेते बोलणी करत आहेत. १७ पैकी किती जागा मागितल्या, किती मागायच्या यावर अजून कोणाकडेही स्पष्टता नाही. आम्ही सात जागा मागितल्या, राष्ट्रवादीने किती मागितल्या, भाजपाने किती मागितल्या या सगळ्या चर्चा आहेत. या चर्चेचा शेवट देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांची बैठक झाल्यानंतर होणार आहे. (पान ६ वर...)

# उष्माघाताने गेल्या ४८ तासांत यवतमाळ जिल्ह्यात ८ जणांचा मृत्यू



**यवतमाळ (प्रतिनिधी)** –राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० ते ४५ अंशावर गेला आहे. यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच यवतमाळ जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. यवतमाळ जिल्ह्यात प्रचंड उष्णलहरी सुरु असताना गेल्या ४८ तासांत आठ जणांचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. हे सर्व मृत्यू उष्माघाताचे बळी असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार या सर्वांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन अहवाल यायचे असल्याने त्यानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. दिग्रस येथे चोवीस तासात तिघांच्या मृत्यूची माहिती पुढे आली होती. यासोबतच यवतमाळच्या चापमनवाडी आणि भोसा मार्गावर दोघांचे, पुसदमध्ये दोन तर बाभुळगाव येथे एकाचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. यातील चौघांची ओळख पटली असून, चौघे अज्ञात आहेत. बाभुळगावच्या गवंडी ते किन्ही रस्त्यावर पुलाखाली मारोतराव कावे यांचा मृतदेह आढळून आला. तर पुसदच्या हनुमान वॉर्डात अन्नपूर्णा मुळे या वृद्ध महिलेने भर उन्हात कुलरमध्ये पाणी भरले, त्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागलं, रूग्णालयात हलविल्यानंतर उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. पुसदच्याच नगरपरिषदेच्या इंदिरानगर भागातील डम्पिंग यार्ड समोर सुभाष राठोड यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. जिल्ह्यात प्रचंड उष्ण लहरी वाहत असून, भर उन्हात बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

हवामान विभागाने जिल्ह्याला आज रेड अलर्ट जाहीर केला आहे. त्यामुळे रविवारी सर्वाधिक तापमान व तीव्र उष्णतेची लाट राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. मागील तीन दिवसांपूर्वी हवामान विभागाने (पान ६ वर...)

# गोदावरी नदीपात्रात बुडून दोन बालकांचा मृत्यू

## एक जण सुदैवाने बचावला, नगिना घाट परिसरातील घटना



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या अण्णाभाऊ साठे चौक परिसरात राहणारे अंदाजे १३ ते १४ वर्षे वयोगटातील ३ बालकं गोदावरी नदीपात्रातील नगिना घाट परिसरात दुपारी पोहण्यासाठी उतरले, परंतु त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने तिघांपैकी दोघांचा बुडून मृत्यू झाला तर सुदैवाने एकजण बचावला. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक परिसरात राहणारे रणवीर यशवंत शिंगाडे (वय १४ वर्षे), गणेश डोंगरे वय १३ वर्षे) आणि त्यांचा एक साथीदार असे तिघेजण मिळून वजिराबाद परिसरात गेले. रविवार दिनांक २४ मे रोजी दुपारी चारच्या सुमारास ते नगिना घाट गुरुद्वारापासून खाली नदी पात्रात उतरले. नदीतील पाणी पाहून त्यांना पोहण्याचा मोह सुटला आणि ते तिघेही नदी पात्रात उतरले. परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने व त्यांना पोहता येत नसल्याने रणवीर शिंगाडे आणि गणेश डोंगरे या दोघांचा बुडून मृत्यू झाला. तर एक जण बचावला. घटनेची माहिती समजताच वजिराबाद पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांचे सहकारी घटनास्थळाकडे धावले. त्यानंतर त्यांनी गोदावरी जीव रक्षक (पान ६ वर...)

# नशेच्या गोळ्या विक्री करणाऱ्या नांदेडमधील दोन मेडिकलवर कारवाई; १५४० गोळ्या जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी रविवार, दि. २३ मे रोजी दोन मेडिकल दुकानांवर कारवाई करून १५४० नशायुक्त गोळ्या जप्त केल्या. जप्त मुद्देमाल अन्न व औषध प्रशासन विभागाच्या ताब्यात देण्यात आला आहे.

वजिराबाद पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथक व अन्न-औषध प्रशासन विभागाने संयुक्त कारवाई करीत नशा निर्माण करणाऱ्या Pregabalin Capsules ची अवैधरित्या विक्री करणाऱ्या दोन मेडिकल चालकांवर कारवाई केली आहे.

शनिवार, दिनांक २३ मे रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ऑक्सिजन मेडिकल,




बाफना नांदेड तसेच हेल्थ ओके मेडिकल, दत्तनगर रोड, सम्राट नगर येथील मेडिकल दुकानांवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत Pregabalin Capsules च्या एकूण १५४० गोळ्या जप्त करण्यात आल्या असून त्यांची अंदाजे किंमत ३८ हजार ३८ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे तसेच पोलीस अंमलदार शिवसांभ मठपती, हबीब चाऊस, रमेश सूर्यवंशी, भाऊसाहेब राठोड, ज्वालासिंग बावरी, पोकले, विलास कदम यांनी ही मोहीम राबवली. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नशेसाठी (पान ६ वर...)

## संसद रत्न पुरस्कार जाहीर; महाराष्ट्राला पाच पुरस्कार



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – यंदाच्या संसद रत्न पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्राचे विशेष वर्चस्व पाहायला मिळत आहे. संसदेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्रातल्या पाच खासदारांना संसद रत्न या बहुमानाने गौरवण्यात येणार आहे.

नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या प्रतिष्ठित संसद रत्न पुरस्कार २०२६ ची घोषणा करण्यात आली. यात महाराष्ट्रातील पाच खासदारांना संसद रत्न या बहुमानाने गौरवण्यात येणार आहे. यामध्ये लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, डॉ. हेमंत विष्णू सावरा, पुण्याच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, जळगावच्या लोकसभा खासदार स्मिता उदय वाघ अशा पाच खासदारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यात दोन महिला खासदारांनाही (पान ६ वर...)

# बलुचिस्तानमध्ये आत्मघाती हल्ला; २६ ठार तर ७० जखमी

**लाहोर (वृत्तसंस्था)** – पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेटा येथे चमन गेट रेल्वे रुळाजवळ एका आत्मघाती हल्लेखोराने जाफर एक्स्प्रेसवर हल्ला केला. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, यात २६ जण ठार झाले आणि ७० हून अधिक जण जखमी झाले.

माध्यमांच्या वृत्तानुसार, स्फोटाच्या वेळी ट्रेन क्वेटा कॅन्टच्या दिशेने जात होती. स्फोट इतका शक्तिशाली होता की अनेक डबे रुळावरून घसरले, ज्यामुळे परिसरात घबराट पसरली. स्फोटानंतर रेल्वे रुळाजवळ आग लागली. अग्निशमन दल, पोलीस, बचाव पथके आणि सुरक्षा दल तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटाच्या तीव्रतेमुळे जवळच्या इमारतींच्या काचा फुटल्या. सुरक्षा यंत्रणांनी परिसर सील केला असून स्फोटाचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. या हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही संघटनेने स्वीकारलेली नाही. बलुचिस्तान सरकारचे गृह व्यवहार विशेष सहायक बाबर युसूफझाई यांनी सांगितले की, या घटनेचा तपास सुरू असून सर्व सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यांनी लोकांना घटनास्थळी गर्दी न करण्याचे आवाहन केले.

जाफर एक्स्प्रेस ही पाकिस्तान रेल्वेद्वारे चालवली जाणारी एक प्रमुख लांब पल्ल्याची प्रवासी रेल्वेगाडी आहे. ती बलुचिस्तान प्रांताची राजधानी क्वेटाला पाकिस्तानमधील प्रमुख शहरांशी जोडते. ही रेल्वेगाडी (पान ६ वर...)

# नांदेडमध्येही आयएसटी सिग्नल सिस्टीममुळे वाहतूक व्यवस्थापनाला नवी दिशा मिळणार

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– इंटेलिजंट स्मार्ट ट्राफिक सिग्नल सिस्टममुळे शहरातील वाहतूक व्यवस्थापनाला नवी दिशा मिळणार आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर वाढती वाहतूक कोंडी, अपघातांचे प्रमाण आणि वेळेचा अपव्यय कमी करण्यासाठी आता इंटेलिजंट स्मार्ट ट्राफिक सिग्नल सिस्टम प्रभावी पर्याय ठरणार आहे. वजिराबाद मुख्य चौकात लावण्यात आलेली आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कार्य करणारी ही प्रणाली वाहतुकीच्या प्रमाणानुसार सिग्नलचे नियंत्रण स्वयंचलित पद्धतीने होणार आहे. या प्रणालीचा वापर वाहनधारकांनी योग्यरीत्या करावे, असे आवाहन अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी केले आहे.


या स्मार्ट सिस्टममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, सेन्सर्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चा वापर करण्यात आला आहे.



रस्त्यावर वाहनांची संख्या जास्त असल्यास त्या मार्गावरील हिरवा सिग्नल अधिक वेळ सुरू ठेवला जातो, तर कमी वाहतूक असलेल्या मार्गांवर वेळ कमी केला जातो. त्यामुळे अनावश्यक प्रतीक्षा टळून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होत आहे.

विशेष म्हणजे, रुग्णवाहिका, अग्निशमन दल किंवा पोलिसांच्या आपत्कालीन वाहनांना प्राधान्य देण्यासाठीही ही यंत्रणा सक्षम आहे. वाहन जवळ येताच संबंधित मार्गावरील सिग्नल आपोआप हिरवा केला जातो. यामुळे आपत्कालीन सेवांना मोठा फायदा होणार आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर देखील या प्रणालीद्वारे लक्ष ठेवले जाते. रेड सिग्नल तोडणे, वेगमर्यादा ओलांडणे किंवा हेल्मेट नसणे अशा प्रकारांची नोंद कॅमेऱ्यांद्वारे महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक परिवहन विभागाकडून लावण्यात आलेला दंड करून ई-चलन जारी करण्यात येणार आहे. ज्या मार्गावर वाहतूक जास्त आहे त्या ठिकाणी अधिक वेळ सुरू ठेवला जातो, तर कमी वाहतूक (पान ६ वर...)



# व्हाईट हाऊस बाहेर अंदाधुंद गोळीबार

## डोनाल्ड ट्रम्प होते टार्गेटवर?

**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)** – अमेरिकेच्या अध्यक्षांचे कार्यालय आणि निवासस्थान असलेल्या व्हाईट हाऊसलाच लक्ष्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन गोळीबाराने हादरली. रविवारी एका हल्लेखोराने गोळीबार केला. व्हाईट हाऊसच्या सुरक्षा यंत्रणांनी प्रत्युत्तरात गोळीबार केला. यात हल्लेखोर जखमी झाला आणि उपचाराला नेत असतानाच त्याचा मृत्यू झाला.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये असतानाच एका हल्लेखोराने अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, एक व्यक्ती बॅग घेऊन सीक्रेट सर्व्हिस चेकपॉईटच्या दिशेने गेला. तिथे असलेल्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येण्यापूर्वीच त्याने बॅगेतून पिस्तुल काढले आणि गोळीबार सुरू केला. तब्बल २५ फेऱ्या झाडण्यात आल्या.

अचानक गोळीबार सुरू झाल्याने व्हाईट हाऊस परिसरात धावपळ सुरू



झाली. त्यानंतर जवानांनी हल्लेखोराला रोखण्यासाठी मोहीम सुरू केली. रॉयटर्स वृत्तसंस्थेच्या रिपोर्टनुसार, व्हाईट हाऊस परिसरात गोळीबार करणाऱ्या हल्लेखोरांवर स्टेट्स सीक्रेट सर्व्हिसच्या जवानांकडून प्रत्युत्तरात गोळीबार करण्यात आला. त्यात तो जखमी झाला. रुग्णालयात घेऊन जात असतानाच त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोर २१ वर्षांचा असून, नसीरे बेस्ट असे त्याचे नाव आहे. तो मेरीलँड येथील होता. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या गोळीबारात एक नागरिक जखमी झाला आहे. हा व्यक्ती हल्लेखोराच्या गोळीबारात जखमी झाला की, जवानांनी प्रत्युत्तर दाखल केलेल्या गोळीबारात, याबद्दल कळू शकलेले नाही. या गोळीबारात सीक्रेट सर्व्हिस जवानही जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. ज्यावेळी ही गोळीबाराची घटना घडली, तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे व्हाईट हाऊसमध्ये होते. गोळीबार सुरू होताच सुरक्षा जवानांनी संपूर्ण परिसर बंद केला आणि प्रत्युत्तरात गोळीबार सुरू केला. त्यामुळे हल्लेखोराला व्हाईट हाऊसच्या इमारतीपर्यंत पोहोचता आले नाही.

# इराण सामुद्रधुनीतील मार्ग खुला करण्यास तयार, एका महिन्यात चित्र पूर्ववत होण्याची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष चर्चेतून संपण्याची शक्यता निर्माण झाली असतानाच आणखी एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. पुढील ३० दिवसांत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांची संख्या पहिल्यासारखी होईल, असं इराणकडून जाहीर करण्यात आलंआहे. म्हणजेच अमेरिका आणि इराण युद्ध सुरु होण्यापूर्वी ज्या प्रमाणात जहाज होर्मुझमधून जात होती तितक्या संख्येनं जाऊ शकतात. ही जगभरातील विविध देशांसाठी दिलासा देणारी अपडेट आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जवळपास आंतरराष्ट्रीय इंधन पुरवठ्यापैकी २० टक्के वाहतूक होते. अमेरिका आणि इराण युद्धामुळं होर्मुझचा मार्ग बंद झाल्यानं आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार होर्मुझवरुन एक सहमती होत आहे. मात्र, इराणकडून देखील काही बाबी



स्पष्ट करण्यात आल्यात, त्यानुसार होर्मुझमधील स्थिती युद्धाच्या पूर्वी होती तशी होईलच असं नाही. पाश्चिमात्य माध्यमांकडून होर्मुझमधील स्थिती पूर्ववत होईल, असं सांगण्यात आलं होतं. मात्र, याबाबतचं वृत्त इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेकडून फेटाळण्यात आलं आहे. तसनीम वृत्तसंस्थेच्या दाव्यानुसार या कराराची व्याप्ती मर्यादित असेल.

रिपोर्टनुसार पुढील ३० दिवसांमध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीत ३० दिवसात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कमर्शिअल जहाजांची संख्या हळूहळू युद्धाच्या (पान ३ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

**गोदातीर समाचार**

संपादक
**केशव घोणसे पाटील**


# माणूस महत्त्वाचा की भटके कुत्रे?

आपल्या देशात प्राण्यांबद्दल करुणा दाखवणे ही चांगली परंपरा मानली जाते. मात्र, गेल्या काही वर्षांत या करुणेचे रूपांतर अतिरेकी भावनिकतेत झाले आहे. काही तथाकथित प्राणीप्रेमी संघटना, त्यांच्या नेत्या मनेका गांधी आणि कार्यकर्ते भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नाकडे इतक्या एकांगी पद्धतीने पाहतात की, त्यात सामान्य नागरिकांचे हक्क, मुलांचे सुरक्षित बालपण, वृद्धांचे रस्त्यावरचे स्वातंत्र्य आणि महिलांची सुरक्षितता यांचा पूर्ण विसर पडतो. प्राण्यांवर प्रेम करणे वेगळे आणि त्यांच्या नावाखाली समाजाला धोक्यात ढकलणे वेगळे. भटक्या कुत्र्यांबद्दल येणारा अवाजवी व अनाठायी पुळका हा मनुष्याच्या जीवाला घातक ठरतो आहे नव्हे ती एक आता समस्याच बनली आहे. देशात भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेली भीती आता केवळ सामाजिक समस्या राहिलेली नाही, तर ती सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनली आहे. अशा पार्श्वभूमीवर रेबीजग्रस्त आणि हिंसक भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका महत्त्वाची आणि वास्तववादी ठरते. नागरिकांच्या जीविताचा अधिकार महत्त्वाचा की आक्रमक कुत्र्यांचे अमर्याद संरक्षण? हा न्यायालयाने उपस्थित केलेला प्रश्न केवळ कायदेशीर नाही, तर सामाजिक विवेकाला जागवणारा आहे. आज देशातील अनेक शहरांत शाळेत जाणाऱ्या मुलांवर कुत्र्यांचे हल्ले होत आहेत. सकाळी चालायला जाणारे ज्येष्ठ नागरिक जखमी होत आहेत. ग्रामीण भागात तर रेबीजमुळे मृत्यूची उदाहरणेही वाढत आहेत. तरी-सुद्धा काही मंडळी प्रत्येक नियंत्रणात्मक उपायाला क्रूरता असे लेबल लावून विरोध करतात. प्रश्न असा आहे की, मानवी जीवाचे मूल्य नेमके कुठे हरवले आहे? एखाद्या निरपराध मुलाचा जीव गेला की काही दिवस सोशल मीडियावर सहानुभूती व्यक्त केली जाते; पण पुन्हा त्याच समस्येकडे दुर्लक्ष होते. खरे म्हणजे भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ कुत्र्यांची नाही, तर प्रशासनाच्या अपयशाची आहे. शहरांतील कचराकुंड्या, अस्वच्छता, निर्बंधहीन अन्नटाकावू व्यवस्था आणि निष्क्रिय महानगरपालिका यांनी या समस्येला खतपाणी घातले. नसबंदी मोहिमा कागदावरच राहिल्या, प्राणी निवारे अपुरे राहिले आणि स्थानिक प्रशासनाने जबाबदारी झटकली. परिणामी, भटकी कुत्री मोठ्या प्रमाणात वाढली आणि त्यांचे टोळके नागरिकांसाठी धोका बनले. परंतु या अपयशाची शिक्षा सामान्य माणसाने का भोगावी? काही प्राणीप्रेमी ज्या प्रकारे भटक्या कुत्र्यांना खाद्य पुरवतात, त्यांचे संरक्षण करतात आणि कोणत्याही कारवाईला विरोध करतात, त्यामुळे समस्या अधिक गंभीर बनते. सार्वजनिक रस्ते, उद्याने आणि वसाहती या माणसांसाठी आहेत की हिंसक प्राण्यांसाठी, हा प्रश्न आता लोकांना पडू लागला आहे. करुणा जर विवेकशून्य झाली, तर ती समाजविघातक ठरते. जगातील प्रगत देशांमध्येही प्राण्यांवर प्रेम केले जाते; पण त्याचवेळी सार्वजनिक सुरक्षेबाबत तडजोड केली जात नाही. रेबीजग्रस्त किंवा अत्यंत हिंसक प्राण्यांना मानवतावादी पद्धतीने मृत्युदंड देण्याची व्यवस्था तिथे अस्तित्वात आहे. कारण शासनाचे पहिले कर्तव्य नागरिकांचे प्राण वाचवणे हेच असते. भारतात मात्र कोणतीही कठोर कारवाई सुचवली की, लगेच भावनिक आंदोलन उभे राहते किंवा राजकीय फायद्यासाठी उभे केले जाते. परिणामी समस्या अधिक चिघळते. समाजाने दोन टोकांच्या भूमिका टाळल्या पाहिजेत. एकीकडे प्राण्यांवर क्रूरता असू नये, हे जितके खरे; तितकेच दुसरीकडे माणसांच्या सुरक्षेची उपेक्षाही चालणार नाही. विवेकपूर्ण संतुलन साधणे हीच खरी सभ्यता आहे. आज गरज आहे ती भावनिक घोषणांपेक्षा ठोस धोरणांची. व्यापक नसबंदी मोहीम, स्वच्छता व्यवस्थेतील सुधारणा, पुरेसे प्राणी निवारे आणि हिंसक प्राण्यांबाबत कठोर निर्णय, या सर्वांचा एकत्रित विचार झाला पाहिजे. ज्यांचे माणसापेक्षा प्राण्यांवर अधिक प्रेम आहे, ज्यांच्या घरी गादीवर मॅम सोबत कुत्राही झोपतो, अशा लोकांनी आपल्या प्राणीप्रेम या नावाखाली सामान्य माणसांचे जीवन धोक्यात घालण्याचा सल्ला देऊ नये, कारण त्यांच्यामध्ये अशा प्रकारची प्रवृत्ती वाढतच चालली आहे. मानवतेचा अर्थ केवळ प्राण्यांबद्दल करुणा दाखवणे नसतो; तर माणसांचे प्राण सुरक्षित ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असते. समाजाने आता भावनिक अतिरेकातून बाहेर पडून वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज



मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवाला-नुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.

भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.

आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.

समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे 'वापरा आणि फेका' ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.

प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे.

आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे.

आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. 'रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल' या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.

आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो.

या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानव-सेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# धर्माच्या नावानं कुणीही रक्त सांडवू नये!

आज सर्वच लोकं मी अमुक धर्माचा, तो अमूक धर्माचा, असं म्हणून समाजात धार्मिक तेढ निर्माण करतात. त्याच आधारावर भांडतात. एकमेकांची कत्तल करतात. पर्यायानं सांगायचं झाल्यास धर्माच्या नावावर अशी मंडळी आपल्याच भावा बहिणींचं रक्त सांडवतात. जे इतिहासात घडलेलं दिसलं. इतिहासात धर्माच्या नावावर अनेक युद्ध झाली. काहींच्या माना कापल्या गेल्यात. अनन्वित छळ झाले आणि ज्यांनी ज्यांनी हाल केलेत. ती मंडळी हेही विसरली होती की मी याच देशाचा रहिवाशी असून माझा धर्म नेमका कोणता होता? कोणता असू शकतो? अन् माझ्या शरीरात कोणाचे रक्त असू शकते? महत्वपुर्ण बाब ही की जर धर्माचा हाच इतिहास लक्षात घेतल्यास आता या देशात राहणारे सर्व वेगवेगळ्या धर्माचे लोक हे एकाच आईची लेकरं असून ते आजही एकाच धर्माचे आ-हेत. आज जरी ते वेगवेगळ्या धर्माचे असले तरी. मग मी अमुक धर्माचा व मी तमुक धर्माचा. अशा प्रकारचे विचार आपल्या मनामध्ये का यावेत? का येवू द्यावेत आपण? ही विचारात घेण्यालायक वस्तुस्थिती आहे याचा सर्वांनी विचार करावा.

धर्म कोणताही का असेना, धर्माबाबत लोकं आगपाखड करीत असतात. ही आगपाखड असते, आपल्या धर्माला श्रेष्ठ समजण्यासाठी. परंतु तसं श्रेष्ठ समजत असतांना हाताची चार बोटं आपल्याकडे असतात. ही गोष्ट विसरली जाते. धर्माबाबत सांगायचं झाल्यास काही धर्म असेही आहेत की त्या धर्माला आजची मंडळी ही नेहमीच दुषणं लावत असतात. त्या धर्माला काहीबाही बोलत असतात आणि त्याही धर्मातील लोकं न चिडता, न रागवता आपल्याच धर्माला काहीबाही म्हणणाऱ्या लोकांचे वाईट बोल न रागवता ऐकत असतात. कारण त्यांच्यात सहनशिलता ही कुटकूट भरलेली असते. परंतु काही धर्म असेही आहेत की, त्या धर्माबाबत साधा ब्र देखील उल्लेखला गेला तर दंगे होतात. ज्याला धार्मिक दंगे असंही नाव आहे.

जैन आणि बुद्ध धम्म. या दोन धर्माचा जन्म हा भारतातील आहे. सध्या भारतात अनेक धर्म आहेत. वैदिक धर्मही आर्यांनीच आणलेला असून जर आर्यांना परकीय मानल्यास तोही धर्म बाहेरीलच. तसा बौद्ध व जैन धर्म येथील असंतुष्ट असलेल्याच घटकांनी स्वीकारला असेल त्या काळात. ज्यात द्रविड अर्थात आदिवासीही असू शकतात आणि मुळातील आर्य अर्थात वैदिक धर्माचे लोकंही असू शकतात की जे इतर देशातून आले. परंतु ते इथंच बऱ्याच वर्षांपासून राहात असल्यानं भारतीयच झाले. पुढं भारतात तीन धर्म अस्तित्वात आल्यानंतर त्या तीनही धर्मांना राजाश्रय प्राप्त झाला. येथूनच निर्माण झाला खरा संघर्ष. धर्माबाबत आगपाखड आणि आपला धर्म वाढविण्यासाठी केलेला सत्तासंघर्ष. ज्यात राग येवून एकमेकांच्या धर्मातील लोकांना कापणं. त्यांची बेवारस विनाकारण हत्या करणं. हे चालत राहिलं, अरब भारतात येईपर्यंत. तसं पाहिल्यास प्रत्येक राज्यांनी एकमेकांना जिंकल्यावर आपली राजेशाही निर्माण केली व या भारतात आपलाच धर्म टिकून राहावा म्हणून स्थापत्य कलेला भरपूर वाव दिला. अनेक बांधकामं केली. त्यानंतर उजळला अर्वाचीन काळ. त्या काळाचा इतिहास आपल्याला माहीत असेलच. अर्वाचीन काळात मुस्लिम आणि त्याकाळचे देशातील सर्व धर्मीय अर्थात बौद्ध, जैन व वैदिक लोकांचे युद्ध झाले. आपला अरबी धर्म वाढवीत असतांना अल्लाउद्दीन खिलजींनी नालंदा व तक्षशिला ही दोन्ही विद्यापीठं नष्ट केलीत असं म्हटलं जातं व मानलंही जातं. त्यांनी अनेक स्तूपंही पाडली असावीत. असा अंदाज आहे. काही लोकांचं म्हणणं तसंच आहे व काहींचं म्हणणं वेगळंच आहे.

मूळचे वैदिक असलेल्या धर्मातील काही लोकं हे सहिष्णू होते. त्यांचं शक्यतोवर धर्मासाठी रक्त खवळत नव्हतंच. हं, पुष्पमित्र शृंगानं राजा बनताच अनेक बौद्धांची हत्या केली. त्यांना हाकलून लावले. अनेक स्तूपं पाडली. ज्यात त्या राजांची अमानुषता व अविवेकीपणा. असंच घडलं इब्राहिम खान लोदींच्या शासनकाळात. त्यानंही तमाम अस्तित्वात असलेल्या वैदिक लोकांना हिंदू म्हटलं. हिंदूचा अर्थ हा हिन आणि दुबळे. यावरुन खरंच वैदिक संस्कृतीत वाढलेली ही मंडळी हिन व दुबळी होती काय? याचं उत्तर नाही असंच येतं. येथील मूळ असलेले द्रविड, ज्यातून पुढे चालून वैदिक, जैन व बौद्ध बनले. त्यांचं रक्त हे दुबळं व हिन जाणवणारं नव्हतंच. मग ते इब्राहिम खान लोदीला हिन आणि दुबळं कसं दिसलं? त्याचं कारण आहे, येथील लोकांमध्ये असलेली सहनशिलता. येथील मुळातील द्रविड वंशातील लोकांचं रक्त हे सहनशील आहे. त्यामुळं साहजीकच येथूनच अस्तित्वात आलेल्या जैन व बौद्ध धम्मातील लोकांचं रक्तही सहनशील आहे. ते स्वतः कचतात. परंतु कोणाला कापत नाहीत. वैदिक धर्मातील लोकांनीही तशीच कृती केली. जी इब्राहिम खान लोदीला दिसली. म्हणूनच येथील वैदिक मंडळी ही हिंदू अर्थात हिन दुबळी ठरली. परंतु ती हिन व दुबळी नव्हतीच.

भारत हा आमचा देश आहे व येथील लोकांचं रक्त सहजासहजी खवळत नाही आणि खवळलं तर ते रक्त कोणाला सोडतही नाही. माणसाच्या अविवेकीपणाला दोष देणारे आमचे तमाम थोर पुढारी. ज्यात संभाजी महाराजच नाही तर आमचे पुर्वज असलेले पृथ्वीराज चव्हाण, राजा दाहिर होवून गेलेत की ज्यांनी शत्रूंना सतरा वेळेस हारवलं व मोठ्या मनानं माफ केलं. परंतु शत्रूंनी त्यांना कपटानं हारवलं. पकडलं व हालहाल करुन मारलं. त्यानंतर तथागत गौतम बुद्ध, वर्धमान महावीर आणि इतर सर्व तमाम थोर पुण्यात्म्ये. त्यांचेही परकीय समजणाऱ्या आपल्याच लोकांनी हालहाल केले. त्यांनी केवळ माणसांच्या अविवेकीपणाला दोष दिला. धर्माला नाही. मात्र काही लोकांनी माणसांची अविवेकीपणा जबाबदार धरला नाही. त्यांनी धर्मालाच जबाबदार धरले व धर्मालाच दोषी धरले. ज्यातून धार्मिक युद्ध झालीत. धार्मिक युद्ध होत गेली. अन् आजही त्याच धर्तीवर धार्मिक वाद होतात. समाजात धार्मिक तेढी निर्माण होतात व धार्मिक दंगेही पसरतात.

विशेष सांगायचं झाल्यास या भारतात राहणाऱ्या तमाम लोकांनी आजच्या काळात धार्मिक युद्ध घडवावीत काय? माझा धर्मच श्रेष्ठ आहे. इतरांचा धर्म श्रेष्ठ नाही. असं मानावं काय? याचा अर्थ नाही असा आहे. त्याचं कारण आहे आपण भारतात राहणारे भारतवाशी. आपण जरी या भारतात हिंदू, मुस्लिम, शिख, इसाई, पारशी, बौद्ध, जैन म्हणून राहात असलो तरी आपण सर्व त्याआधी भारतीय आहोत व द्रविड आहोत. अन् जे कोणी द्रविड मानत नसतील. त्यांनी नक्कीच स्वतःला विदेशीच समजावं. कारण येथील मुळचा व्यक्ती हा द्रविडच आहे. ज्याला त्याचा धर्मही कोणता ते माहीत नव्हतं. ते येथेच बाहेरुन आलेल्या आर्यांनी शिकवलं, ज्यातून ते वैदिक ठरले. पुढे याच द्रविडांचे बुद्ध, जैन झाले. पुढे याच तीन धर्माचे आणखी तुकडे झाले व काही मुस्लिम झाले. हे विसरता कामा नये. म्हणजेच सर्वच धर्माचे लोकं हे द्रविडांपासून अस्तित्वात आले. हे नाकारता येत नाही. कारण मुळच्या द्रविडांचं धर्मपरीवर्तन हे कधी जोर जबरदस्तीनं झालं तर कधी महत्व समजून आल्यानं. आपण मुळच्या जुन्याच द्रविडांचे वंशंज आहोत. त्याचं द्रविडांचं रक्त अंश प्रमाणात का असेना, आपल्यात आहे. अन् ते अनुवंशशास्त्रानुसार थोडं थोडं आलेलं आहे. जे रक्त सहिष्णू आहे. ते रक्त लवकर खवळूच शकत नाही आणि खवळूही नये. तसंच ते रक्त आपल्याच पुर्वजांचं आहे. जे रक्त आपल्याच नात्यातील आहे. असं जर आहे तर मग ते रक्त का खवळावं आज धर्माच्या नावावर? ते रक्त का खवळू द्यावं आपण आज कोणत्याही धर्माच्या नावावर? तसेच आपण आज जरी वेगवेगळ्या धर्मातील असलो तरी आपण आज मुळच्या द्रविडांचे रुपांतर असल्यानं व सहिष्णू असल्यानं आपण आपल्यात धार्मिक तेढ निर्माण न होवू देता तमाम भारतात राहणारे आम्ही सर्व भारतीय आहोत. हीच भावना सर्वांनी मनात बाळगावी.


जरी आज आपण इतर धर्मात अधिवास करीत असलो तरी. जेणेकरुन या देशात धार्मिकतेवरुन कोणतेच वाद वा दंगली होणार नाहीत. शांतता टिकेल व सुव्यवस्थाही राहिल. हे तेवढंच खरं. आपण सर्व धर्मियांनी एकमेकांशी भावाबहिणींच्याच नात्यानं राहावं. कुणीच कुणाचं निदान धर्मासाठी तरी रक्त सांडवू नये म्हणजे पावलं. कारण या भारतात राहणारे आपण सर्व वेगवेगळ्या धर्मातील लोकं एकाच आईची लेकरं आहोत. आपण सर्व भारतीय व भारतवाशी आहोत. हे नाकारता येत नाही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व : दीपक कदम

हल्लीच्या काळात ध्येयाने प्रेरित होऊन आणि भानावर राहून बेभानपणे काम करणारे, प्रसिध्दीपासून जाणीवपूर्वक कोसो दूर राहणारे आणि आपण केलेल्या आभाळाएवढ्या कार्याचा कुठेही ब्र न काढणारे सच्चे कृतीशील मित्र भेटले की, जगण्याचा अर्थ आपसूकच गवसत जातो. काही माणसांचा नुसता सहवास सुध्दा कित्येकांसाठी विद्याभ्यास ठरतो. अनुभव, मनाची निर्मळता, निष्कलंक चारित्र्य, चौफेर बुध्दीमत्ता, चौखूर विद्वत्ता, दांडगा व्यासंग, इत्यादी बाबी झाकत नसतात. माणूस पोहोचायच्या आधी त्याची किर्ती किंवा अपकिर्ती तिथे पोहोचत असते. बावनकशी सोनं आणि अस्सल हिरा कसा झाकल्या जाईल.? माझे वडील न्या. भीमराव नरवाडे पाटील (दादासाहेब) नेहमी म्हणतात की, तुम्ही स्वतःला सिध्द करा, जग तुम्हाला प्रसिध्द करेल. काळाच्या सर्व कसोट्यांवर राष्ट्रहितेषी निकष लावल्यानंतर मनाच्या कोपऱ्यात सर्वोच्चपदी बसणारे ध्येयवेडे व्यक्तिमत्व म्हणजे आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम सर.!

दीपक कदम यांच्यशी सर्वश्रुत असलेल्या आमच्या मैत्रीतून कदम सरांविषयी व्यक्त होताना वाढदिवसानिमित्त दीपक कदम यांचे अभीष्टचिंतन; त्यांना उत्तम आरोग्य आणि उदंड आयुष्य लाभो ही मंगल कामना. दीपक कदम यांच्या शंभराव्या वाढदिवस सोहळ्यास सहिसलामत सर्व मानवी अवयवांसह स्वतःच्या पायावर चालत जाऊन उपस्थित राहण्याचे परमभाग्य आम्हा सर्व मित्रांना लाभो हीच सदिच्छा.!



आईवडील, भाऊबहीण इत्यादी बायोलॉजिकल रिलेशन्समध्ये आपल्याला चॉईस नसतो. नॉनबायोलॉजिकल रिलेशन्समध्ये चांगला शेजारी, रेल्वे-बस-विमानात चांगला सहप्रवासी लाभणं ही देखील योगायोगाची गोष्ट असेल. प्रेम सुध्दा बऱ्याचवेळा ठरवून होत नाही. प्यार किया नही जाता, हो जाता है. पण मैत्री मात्र बहुतांश वेळा बाय चॉईस आपण ठरवत असतो. युंही कोई किसिसे दोस्ती नहीं करता, जब दिल मिलते हैं तो हाथ मिलाना अच्छा लगता है. समवयी, समव्यसनी, समध्येयी, समगुणी, समव्यवसायी, समदुःखी, समसुखी, समविचारी, काहीतरी समानता असल्याशिवाय दोस्ती पक्की होत नाही. हुडकून आणि मुद्दाम जाऊन दोस्ती करावी अशी मोजकी माणसे आयुष्यात भेटतात. अशा मोजक्या माणसात अग्रक्रमाने नाव घ्यावे असे आमचे मित्र म्हणजे दीपक कदम, एक अजब रसायनाचा अवलिया गृहस्थ.!

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाची चांगली सर्विस दिपक कदम यांना तरुण वयातच लागलेली, चारचौघांसारखा विचार करुन तिथे राहिले असते तर आज किमान अतिरिक्त जिल्हाधिकारी या सन्मानजनक पोस्टवर ते कार्यरत राहिले असते व आपल्या उपजत कार्यकुशलतेने आपल्या अधिकारीपदाची राज्यभर छाप निश्चितच सोडली असती. पण सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत सिध्दार्थ गोतम बुध्द, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवराय, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, क्रांतिसूर्य ज्योतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, महात्मा कबीर, जगतगुरु तुकाराम महाराज इत्यादी संत व महापुरुषांच्या विचारांचा पगडा असलेल्या या चतुरस्त्र पठ्ठ्याने काळापुढचा विद्रोही विचार केला आणि संविधानाधिष्ठित अधिकाऱ्यांची पिढी घडविण्याचा चंग बांधला. त्यावेळी अनेकांनी वेड्यात काढलेल्या व वाट चुकलेला म्हणून हिणवलेल्या पुत्राला पित्याने व भावाला बहिणीने मात्र साथ दिली. वडिलांनी पेन्शनची पूर्ण रक्कम या वेड्यापिराच्या हवाली केली आणि बहिणीने स्वतःच्या मालकीचा भूखंड देऊ केला. तिथून पुढे सुरू झाला दी लाईफ इज ए सेलेब्रेशन, जीवन हा एक उत्सव आहे. आपल्यामुळे किती जणांच्या चेहऱ्यावर हसू फुललं यावर आनंदी जीवनाचं मुल्यमापन करावं; हा आपल्या जगण्याचा सिंपल फंडा असावा असे मला वाटते. क्रांतिपुरुष इंजि पुरुषोत्तम खेडेकर सर नेहमी पे बॅक टू सोसायटी हा आग्रह धरतात. समाजाला आपल्यातील सर्वोत्तम देण्यात आंबेडकरवादी मिशनच्या माध्यमातून दिपक कदम सर सदैव तत्पर असतात.

दीपक कदम सरांसारख्या आनंदयात्रींची समाजाला व देशाला गरज आहे. आज वाढदिवसाच्या दिवशी मित्रांचा थोडेसेच स्वकेंद्रित बनण्याचा हा हट्ट त्यांनी पुरवावा. स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी या अपेक्षेसह सरांना पुनश्च उदंड, निरोगी, निरामय व आनंददायी आयुष्याच्या मनभरून व भरभरून सदिच्छा.

**-इंजि शिवाजीराजे पाटील बाभळीकर**
राष्ट्रीय अध्यक्ष - वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद
नांदेड (महाराष्ट्र)

# गोवंश संरक्षणासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी; विश्व हिंदू परिषद- बजरंग दलाची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात नियमितपणे होत असलेली गोवंश हत्या तसेच आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर होणारी कथित गोवंश कुर्बानी तत्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्या वतीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. गोवंश संरक्षण हा केवळ धार्मिक विषय नसून कायदा, पर्यावरण, कृषी व्यवस्था आणि सामाजिक सलोखा यांच्याशी संबंधित संवेदनशील विषय असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात लागू असलेल्या 'महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६' तसेच 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६०' अंतर्गत गोवंश हत्येबाबत स्पष्ट बंदी असतानाही जिल्ह्यात काही ठिकाणी अवैध कत्तली सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे कायद्याचे उल्लंघन होत असून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच गोवंश वाहतूक, अवैध व्यापार आणि कत्तलीसाठी होणारी हालचाल रोखण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. भारतीय संविधानातील कलम ४८ नुसार राज्य सरकारवर गोवंश संरक्षणाची जबाबदारी असून, संविधानातील कलम ५१ (अ) (ग) नुसार प्रत्येक नागरिकाने सजीव प्राण्यांविषयी करुणा बाळगणे हे कर्तव्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

'स्टेट ऑफ गुजरात विरुद्ध मिर्झापूर मोती कुरेशी कसाय' या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही उल्लेख करण्यात आला. त्या निर्णयात गोवंश संरक्षण हे सार्वजनिक हिताशी संबंधित असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. गोवंश हा भारतीय कृषी व्यवस्थेचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे सांगत निवेदनात रासायनिक शेतीमुळे मातीची सुपीकता कमी होत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय आणि ग्रामीण जीवनव्यवस्थेत गोवंशाचे महत्त्व आजही कायम असल्याचे नमूद करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन आणि मानवी आरोग्याच्या दृष्टीनेही गोसंवर्धन आवश्यक असल्याचा दावा करण्यात आला. निवेदनात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांच्यासह विविध संत-महात्मे आणि समाजसुधारकांनी गोसंरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केल्याचा उल्लेख करण्यात आला. भारतीय संस्कृतीत गोवंशाला विशेष स्थान असून, त्याच्या संरक्षणासाठी प्रशासनाने अधिक प्रभावी पावले उचलण्याची गरज व्यक्त करण्यात आली. जिल्ह्यातील काही घटनांमुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असून त्यातून सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. अशा प्रकारांकडे केवळ गुन्हा म्हणून न पाहता कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित संवेदनशील विषय म्हणून पाहावे, अशी मागणी करण्यात आली. बकरी ईदच्या काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने दक्षता वाढवून संशयित ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

# पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाकडून किनगाव येथे जुगार अड्ड्यावर छापा



**नांदेड (प्रतिनिधी)** – दि. १ ते ३१ मे २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या २२ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या अधिपत्या-खालील पथकाने लातूर जिल्ह्यातील किनगाव पोलीस ठाणे हद्दीत मौजे खंडाळी शिवार येथे तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या ८ इसमांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रकमेसह ८ लाख ४८ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी किनगाव पोलीस ठाणे येथे जुगार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच परिक्षेत्रात मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण २९ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ९ लाख ५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध दारू विक्री करणाऱ्या १९ इसमांविरुद्ध १९ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून ५१ लाख ७९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गांजा विक्री करणाऱ्यांविरुद्धही २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून २ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाईसोबतच शस्त्र अधिनियमान्वये १, कोटपा अन्वये ४ तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ४२ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ६३ लाख ९२ हजार ४६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# नांदेड जिल्ह्यात मासरेड; ६० आरोपींवर कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पूर्णतः बंद करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत २३ मे रोजी मासरेड टाकण्यात आली. त्यात ६० आरोपींवर कारवाई करून २ लाख १४ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे आणि जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत २३ मे रोजी मासरेडचे आयोजन केले होते. या ऑपरेशनमध्ये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली भोकरच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग नोंदविला होता.

या मासरेडमध्ये अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे तसेच जुगार खेळणारे व गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या ठिकाणांवर छापा टाकण्यात आला. या मोहिमेमध्ये जिल्ह्यात ४१ गुन्हे नोंद करण्यात आले. त्यात साठ आरोपींवर कारवाई करून २ लाख १४ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# कौठा येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री साई मंदिर संस्थान व गौशाळा, कौठाच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. २५ मे ते १ जून २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी भाविकांना दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथाकार ह.भ.प. प्रवीण महाराज पार्डीकर यांच्या अमृतवाणीतून कथा श्रवणाचा लाभ मिळणार आहे. तसेच नित्य पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ६.३० ते ७.३० श्री साईबाबांचा अभिषेक, सकाळी ८ ते ११ श्री साई चरित्र पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्रौ ८ ते १० हरिकीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत.

तसेच दि. १ जून रोजी सांगता सोहळ्यात सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. गोपाळ महाराज ठाकूरबुवा पंढरपूरकर यांचे काल्याचे कीर्तन व तद्नंतर महाप्रसाद भंडारा होणार आहे. तरी भाविकांनी दर्शनाचा, श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, सचिव श्रीराज चक्रवार व कोषाध्यक्ष जगन्नाथ चक्रवार आणि विश्वस्त मंडळ श्री साई संस्थान व गौशाळा, कौठा वसरणीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रतिभा निकेतन महाविद्यालयात योगसाधना केंद्राचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथे भारतीय योग संस्थान (दिल्ली), छत्रपती संभाजीनगर विभागा-मार्फत मार्च महिन्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या चार योग केंद्रांपैकी रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी प्रतिभा निकेतन महाविद्यालय योग केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. भारतीय योग संस्थानचे महाराष्ट्र उपप्रांत प्रधान प्रा. डॉ. उत्तम काळवणे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ह्या कार्यक्रमासाठी भारतीय योग संस्थानचे पुणे येथील महाराष्ट्र प्रांतमंत्री संजय मराठे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच ह्या कार्यक्रमासाठी नांदेड समन्वयक सुधाकर ढवळे, जिल्हा प्रधान सुरेश डहाके, सुभाषचंद्र सिल्लारकर, क्षेत्रप्रधान के. डी. देशमुख, विठ्ठलसिंह गहेरवाल, सुहास कुळकर्णी, सुरेश शेवाळकर आदी अधिकारी उपस्थित होते.

उद्घाटनाच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा क्यादरकुंटे यांनी तर आभार नेहा दलबसवार यांनी मानले. प्रास्ताविक सुभाषचंद्र सिल्लारकर यांनी केले. श्रध्देय प्रकाशलाल यांच्या संदेशाचे वाचन रुख्मिणी बलशेटवार यांनी केले.


उद्घाटन प्रक्रिया पूर्ण करताना प्रा. डॉ. उत्तम काळवणे यांनी सुवर्णा क्यादरकुंटे यांची केंद्रप्रमुख म्हणून तर रुख्मिणी बलशेटवार यांची उपकेंद्र प्रमुख म्हणून निवड केली व त्यांचे अभिनंदन केले. रेखा पोटपेलवार, अनिता न्यालापल्ली, दीपाली बुलबुले, शोभा लवांडे, मनकरना कोटूलवाड यांनी योगामुळे आलेले अनुभव कथन केले. या अनुभवासोबतच रुख्मिणी बलशेटवार यांनी सुंदर योगकविता सादर केली.

यावेळी बोलताना प्राचार्य किशोर गंगाखेडकर यांनी पावसा-ळ्यात योगासाठी महाविद्या-लयात जागा उपलब्ध करून देण्याचे व शहरात इतर ठिकाणीही योगवर्ग सुरु करण्यास मदत करण्याचे आश्वासन दिले.

प्रा. डॉ. उत्तम काळवणे यांनी अध्यक्षीय समारोपात योगाला आपल्या जीवनात श्वास, झोप, आहारा इतकेच महत्व देण्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनीषा जाधव, दीपाली बुलबुले, राखी लवांडे, ज्योती घाणेकर, मनकर्णिका टोकलवाड व त्यांचे पती, नेहा दलबसवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

नागरिकांनी त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी लाभ घ्यावा असे आवाहन प्रा डॉ उत्तम काळवणे यांनी केले.

# केवळ खरेदीदार नव्हे, विक्रेत्यांवरही गुन्हे दाखल करा; भोकर मुस्लीम समाजाचे पोलीस निरीक्षकांना निवेदन



**भोकर (प्रतिनिधी)**–गो-तस्करीच्या प्रकरणांची चौकशी निष्पक्षपणे व्हावी आणि या प्रकरणाच्या नावाखाली होणारी आडवणूक थांबवून कायदा व सुव्यवस्था राखावी, या मागणीसाठी भोकर येथील मुस्लीम समाजातर्फे रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्या-प्रमाणे गो-तस्करीच्या प्रकरणांची चौकशी करताना पोलिसांनी सर्वंकष तपास करणे आवश्यक आहे. अनेकदा अशा प्रकरणां-मध्ये केवळ खरेदीदार आणि गाडीचालकावरच कारवाई केली जाते. मात्र या प्रकरणांमध्ये मूळ विक्रेत्याचाही तितकाच सहभाग असल्याने त्यांच्यावरही कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

गो-तस्करीच्या नावाखाली काही व्यक्ती किंवा संघटनांकडून कायदा हातात घेतला जात असल्याबद्दल निवेदनात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अशा प्रकरणांत कोणतीही खासगी 'गो-संरक्षण गट' किंवा इतर संघटनांनी हस्तक्षेप करू नये. केवळ पोलीस आणि सरकारी प्रशासनालाच कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे. ज्या व्यक्ती किंवा गट गो-तस्करीच्या संशयावरून काठ्या किंवा शस्त्रांचा वापर करून हिंसाचार घडवून आणतात किंवा मारहाण करतात, त्यांच्यावरही कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

गायीला 'राष्ट्रीय प्राणी' म्हणून घोषित करण्यात यावे. गो-तस्करीच्या नावाखाली मुस्लिम समाजातील लोकांवर होणारे अत्याचार आणि हल्ले त्वरित थांबवण्यात यावेत.

पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनावर म. इमरान करीम कुरेशी, मो. रिजवानोद्दिन, अदीनोद्दीन इनामदार, अदीबोद्दिन इनामदार, शेख फैजान, म. सुजावोद्दिन आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या निवेदनाद्वारे कायदा आणि सुव्यवस्था राखावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली असून, पोलीस प्रशासन यावर काय कार्यवाही करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने लक्ष्मणराव भवरे यांचा गौरव



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –नांदेड येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार लक्ष्मणराव मारोतीराव भवरे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. नाशिक येथील समुद्र लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी, राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, दै. महासागरचे वृत्तसंपादक सुधीर उमराळकर, निसर्गोपचार तज्ज्ञ रावसाहेब घोडेस्वार, नाशिक मनपाच्या स्थायी समितीचे माजी सभापती संजय साबळे, दक्ष पोलीस टाइम्सचे संजय डोंगरे, भीमकन्या रिलस्टार आसावरी बर्वे, संस्थेचे अध्यक्ष अनिल आठवले, सचिव मिलिंद कळवणकर तसेच पत्रकार व निवेदिका आश्विनी पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्ञानदीप सामाजिक विकास संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

# मुदखेड तालुका भाजपा युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील भाजपाचे कार्यकर्ते माधव मारोती वसुरे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाच्या तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण, भोकर विधानसभेच्या आमदार ॲड. श्रीजयाताई चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी भाजपा युवा मोर्चाच्या तालुका उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे यांची नियुक्ती केली आहे.

मुदखेड तालुका भाजपा युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे उत्तर महामंत्री बाळासाहेब देशमुख बारडकर, मुदखेड तालुकाध्यक्ष केशव पाटील मुंगल तसेच नगराध्यक्ष मुदखेड माधव पाटील कदम, तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख, मारोती पाटील किरकन, मुदखेड भाजपा तालुका महामंत्री सचिन पा. मगरे तसेच भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्रदादा चव्हाण, भाजप युवा शहर अध्यक्ष रामभाऊ आबादार व सर्व भाजप कार्यकर्ते आदिंनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# भदंत पंय्याबोधी थेरो यांना छ. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)** – तालुक्यातील खुरगाव-नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धर्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांना छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने भदंत पंय्याबोधी थेरो यांना निवडपत्र देण्यात आले असून, नवीन नांदेड-सिडको येथे दि. २६ जून २०२६ रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती फोर्सच्या वतीने देण्यात आली.

फुले-आंबेडकरी चळवळीसह धम्म चळवळीत अग्रेसर असलेल्या भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सदरील पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यावेळी डॉ. सुजाता पोहरे, डी. एस. वाघमारे, बा. रा. वाघमारे यांची उपस्थिती होती. भदंत पंय्याबोधी थेरो यांना पुरस्कार जाहीर झाल्याने धम्म चळवळीसह सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तथा राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्याबद्दल साधूवाद व्यक्त केला आहे.

**पान १ वरून**

**इराण सामुद्रधुनीतील मार्ग खुला करण्यास तयार....**

अगोदर असलेली स्थिती निर्माण करण्यासाठी योजना तयार केली जात आहे. इराणच्या आर्थिक घडामोडी सुरु होतील, ज्यामुळं थोडासा दिलासा मिळेल. आंतरराष्ट्रीय शिपिंगला वेग मिळेल. मात्र, सुरक्षा आणि रणनीती पहिल्यासारखी नसेल. गेल्या काही महिन्यात आखाती देशांमध्ये तणाव वाढला होता. अमेरिका आणि इस्त्रायलनं इराणवर हल्ले केल्यानंतर इराणनं देखील आखाती देशांमध्ये जिथं अमेरिकन लष्करी तळ असेल त्या देशांवर हल्ले केले होते. इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यानं जगाला होणाऱ्या तेलपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. जगभरात क्रूड ऑईलचे दर आणि बाजाराच्या स्थिती वर परिणाम झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून अमेरिका, इराण आणि त्या भागातील काही देशांसोबत लकवरकच एक करार होईल असं म्हटलं.

# राज्यमाता गोमाता संवाद यात्रेची नांदेड जिल्हा नियोजन बैठक संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)** – ३१ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही संवाद यात्रा नांदेड येथे शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता येणार आहे.

या संवाद यात्रेचे आयोजन महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. गोसेवा आयोगाच्या स्थापनेनंतर तीन वर्षात केलेल्या कार्याचा आढावा, गोशाळांसाठीच्या योजना, गोपालना विषयी शासनाची भूमिका जनमानसात मांडण्यासाठी तसेच लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांना गोसेवा आयोगा-मार्फत चालणाऱ्या योजनांची माहिती व्हावी व पशुसंवर्धन विभाग आणि गोशाळा त्याचबरोबर पोलीस प्रशासन आणि गोशाळा यांच्यामध्ये संवाद घडून यावा यासाठी संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच शेण - गोमुत्र इत्यादींपासून तयार केलेली अर्थात विविध प्रकारची पंचगव्य उत्पादने, गो आधारित स्वास्थ्य चिकित्सा व शेती याविषयी लोकांना माहिती व्हावी व जनजागरण व्हावे असाही या गोमाता संवाद यात्रेचा हेतू आहे. यातूनच गोवंश पालनाविषयी समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होईल. या संवाद यात्रेच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असून, नांदेड जिल्ह्यातील सर्व गोभक्त, गोरक्षक व गोशाळा संचालकांनी या संवाद यात्रेच्या यशस्वीतेसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन गोसेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी यांनी केले.

या राज्यमाता गोमाता संवाद यात्रेस जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद सीईओ, पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, गोपालक व शेतकरी, गोरक्षक अशा सर्वांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

या नियोजन बैठकीस नांदेड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, जिल्हा पशुसंवर्धन सहायक उपायुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, सहायक उपायुक्त डॉ. अरविंद गायकवाड, गोशाळा महासंघाचे जिल्हाध्यक्ष मारोतराव कंठेवाड, हरीश तिवारी, अच्युत महाजन, सत्यवान गरुडकर, भवानभाई पटेल, सनतकुमार महाजन, रघुनाथ सुगावे यांच्यासह जिल्ह्यातील २० गोशाळांचे संचालक उपस्थित होते.

या बैठकीचे प्रास्ताविक पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक उपायुक्त डॉ.अरविंद गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन गोशाळा महासंघाचे जिल्हा सचिव प्रल्हाद घोरबांड यांनी केले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी तंत्रस्नेही गोसेवक आकाश काळे यांनी परिश्रम घेतले.

# प्रगतीमंत्र

**बँकिंग क्षेत्रात करिअर करायचे आहे, पण सुरुवात कुठून करायची? हा प्रश्न पडू शकतो. त्यामुळे अप्रेंटिसशिप तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय असू शकतो. ही एक चांगली संधी आहे, विशेषतः अशा नवीन उमेदवारांसाठी ज्यांना बँकिंगबद्दल जास्त माहिती नाही. अलीकडेच, एसबीआय (SBI) आणि बँक ऑफ बडोदाने १२,००० हून अधिक पदांसाठी अप्रेंटिसशिपची भरती जाहीर केली आहे. जर तुम्हाला या पदांमध्ये रस असेल, तर तुम्ही अर्ज करू शकता. उमेदवारांना अप्रेंटिसशिपबद्दल अनेक प्रश्न पडतात. बँकेतील अप्रेंटिसची कामे काय असतात? बँक अप्रेंटिसशिपसाठी कोण पात्र आहे? पगार किती असतो? हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे.**



# फ्रेशर्ससाठी 12,000+ जागा, SBI-BOB ने काढली भरती

## काम काय असेल अन् किती पगार मिळेल, जाणून घ्या...




### बँक अप्रेंटिसशिप म्हणजे काय?

बँक अप्रेंटिसशिप हा एक प्रशिक्षण कार्यक्रम आहे, ज्यामध्ये निवडलेल्या उमेदवारांना बँकेद्वारे विविध कामे शिकवली जातात. अप्रेंटिसशिप ही कायमस्वरूपी नोकरी नसून, बँकिंग कामकाजाची मूलभूत माहिती शिकण्यासाठीचा एक प्रशिक्षण कार्यक्रम आहे. उमेदवारांना बँकिंग प्रणालीची माहिती मिळते. अर्ज भरण्यापासून ते कागदपत्रांची पडताळणी, खात्याशी संबंधित काम आणि ग्राहकांशी संवाद साधण्यापर्यंतच्या व्यावहारिक कामांची माहिती मिळते.

अप्रेंटिसशिपसाठी उमेदवारांची निवड ऑनलाइन परीक्षा, कागदपत्र पडताळणी आणि स्थानिक भाषेच्या चाचणीद्वारे केली जाते. काही बँका अप्रेंटिसशिपसाठी गुणवत्तेवर आधारित निवड निकषांचे देखील पालन करतात. या माहितीचा तपशील अधिकृत अधिसूचनेत दिलेला आहे.

### शिकाऊ उमेदवाराचे काम काय असते?

- बँकेत शिकाऊ उमेदवार म्हणून निवड झाल्यानंतर, उमेदवारांना त्यांच्या प्रशिक्षणानुसार सुरुवातीची कामे दिली जातात. वरिष्ठ बँक अधिकारी देखील त्यांना या संदर्भात मार्गदर्शन करतात.
- ग्राहकांना मदत करणे : खाती उघडणे, अर्ज भरणे आणि बँकेत येणाऱ्या ग्राहकांना मदत करणे. शिकाऊ उमेदवाराच्या प्रशिक्षणाचा हा मुख्य उद्देश असतो. यामुळे उमेदवारांना ग्राहकांशी संवाद कसा साधावा हे समजण्यास मदत होते.
- दस्तऐवज पडताळणीमध्ये मदत करणे : बँकेच्या बहुतेक कामांमध्ये कागदपत्रांचा समावेश असतो. त्यामुळे, हे उमेदवार दस्तऐवज पडताळणी आणि सत्यापनाशी संबंधित कामे देखील करू शकतात.
- बँक शाखेचे कामकाज : या प्रशिक्षणादरम्यान, उमेदवारांना बँक शाखेचे कामकाज, कॅश काउंटर, टोकन प्रणाली आणि इतर तत्सम कामे दिली जाऊ शकतात.
- बँकिंग सॉफ्टवेअरचा वापर : डेटा एंट्री आणि बँकिंग प्रणालीच्या मूलभूत कामकाजाचे प्रशिक्षण देखील उपलब्ध असते.
- केवायसी आणि खात्याशी संबंधित कामे : तुम्हाला बँकेत केवायसी आणि खात्याशी संबंधित कामांमध्ये मदत करावी लागू शकते.
- ग्राहक सेवा : बँक एटीएम, पासबुक, खाती आणि ऑनलाइन व्यवहारांबद्दलच्या प्रश्नांची उत्तरे देणे हे देखील तुमच्या कर्तव्यांमध्ये समाविष्ट असू शकते.

### पात्रता आणि निवड निकष

बँक अप्रेंटिसशिपसाठी इच्छुक उमेदवारांकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही कामाचा अनुभव सहसा आवश्यक नसतो. उमेदवारांचे वय देखील स्थापित मानकांनुसार असणे आवश्यक आहे. एसबीआय (SBI), बँक ऑफ बडोदा इत्यादी बँकांमधील अप्रेंटिसशिपसाठी किमान वय २० वर्षे आणि कमाल वय २८ वर्षे असणे आवश्यक आहे. नियमांनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवार देखील वयोमर्यादेत सवलतीसाठी पात्र आहेत.

### पगार किती असतो?

बँकेतील तुमच्या अप्रेंटिसशिप प्रशिक्षणादरम्यान, तुम्हाला मासिक विद्यावेतन (स्टायपेंड) मिळते. पूर्ण वर्षासाठी, तुम्हाला दरमहा १५,००० पगार मिळतो. उमेदवारांना इतर कोणतेही लाभ किंवा भत्ते मिळत नाहीत. बँक आवश्यकतेनुसार विद्यावेतनात बदल करू शकते. शाखेच्या स्थानानुसार यात बदल होऊ शकतो.

**बीओबी अप्रेंटिस जागा तपशील...**



- रिक्त जागा : ५,०००
- वयोमर्यादा : २० ते २८ वर्षे
- अर्ज सुरू : १९ मे २०२६
- अंतिम तारीख : ८ जून २०२६

**उमेदवार NAPS आणि NATS पोर्टलच्या अधिकृत वेबसाइटवर अर्ज करू शकतात.**

**एसबीआय अप्रेंटिस जागा...**

स्टेट बँक ऑफ इंडियानेदेखील अप्रेंटिस भरतीची घोषणा केली आहे. तुम्ही बँक ऑफ बडोदा (बीओबी) साठी देखील हा भरती अर्ज भरू शकता. नुकतीच एक संक्षिप्त अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. बँक लवकरच सविस्तर अधिसूचना प्रसिद्ध करेल...

- रिक्त जागा : ७१५०
- प्रशिक्षण कालावधी : १ वर्ष
- ऑनलाइन अर्ज सुरू होण्याची तारीख : १९ मे, २०२६
- अर्ज करण्याची अंतिम तारीख : ८ जून, २०२६

# स्वत :ला दोष द्यायची... एका निर्णयाने बदलले नशीब !, आज रेल्वेमध्ये उच्चपदस्थ अधिकारी !

**कधी कधी आयुष्य माणसाला अशा वळणावर आणून सोडते, जिथे पुढचा मार्ग स्पष्ट नसतो आणि मागे फिरण्याचे धाडसही नसते. प्रत्येक सकाळ नव्या आशेने उजाडते, पण रात्र स्वतःच्या प्रश्नांचे ओझे घेऊन येते. तस्कीन खानची कहाणी असाच एक संघर्ष आहे. एक काळ असा होता जेव्हा तिच्याकडे कोचिंगची फी भरण्यासाठी पैसे नव्हते. ती रोज आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीबद्दल स्वतःला दोष देत असे. मग, एके दिवशी, एका निर्णयाने तिला नशीब बदलण्याचा दृढनिश्चय करायला लावला. अथक परिश्रम, संयम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने कठीण UPSC परीक्षा उत्तीर्ण केली आणि आज ती भारतीय रेल्वेमध्ये अधिकारी आहे. चला जाणून घेऊया, तिची यशोगाथा इतरांना पुढे जाण्यासाठी कशी प्रेरणा देते...**



तस्कीन खान मूळची डेहराडूनची (उत्तराखंड) आहे. तिने सांगितले, की तिला लहानपणापासूनच संघर्षाचा सामना करावा लागला. कुटुंबाच्या गरीब परिस्थितीमुळे तिने शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी घरी शिकवणी द्यायला सुरुवात केली. तथापि, तिचे ध्येय वेगळे होते आणि तिने नेहमीच पुढे जाण्याचे स्वप्न पाहिले होते. एका सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर यूपीएससीबद्दल (UPSC) माहिती मिळाल्यानंतर तिने यूपीएससीची (UPSC) तयारी करण्याचा निर्णय घेतला आणि ते आपले ध्येय बनवले. UPSC च्या तयारीदरम्यान तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सुरुवातीला, ती पूर्वपरीक्षेत सलग तीन वेळा नापास झाली. जेव्हा निकाल अपेक्षेप्रमाणे लागला नाही, तेव्हा तिला रडू कोसळले. या काळात एकटेपणा आणि तणाव इतका वाढला की आयुष्यच कठीण वाटू लागले. तथापि तिने हळूहळू स्वतःला सावरले आणि दृढनिश्चयी राहिली, कारण तिला पुढे जाण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय दिसला नाही. चौथ्या प्रयत्नात तस्कीन खानने UPSC नागरी सेवा परीक्षा २०२२ मध्ये ७३६ वा अखिल भारतीय रँक मिळवला. परीक्षेच्या अगदी आधी वडिलांची प्रकृती खालावली असूनही, ती दृढनिश्चयी राहिली. तिचे यश हे कठोर परिश्रम, संयम आणि आत्मविश्वासाचे फळ आहे. आज, ती भारतीय रेल्वे व्यवस्थापन सेवेत (IRMS) वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहे आणि तरुण पिढीसाठी प्रेरणास्थान बनली आहे.

## बिझनेस

# मुले आजारी पडली तेव्हा सूचली बिझनेस आयडिया !



### सरकारी नोकरी सोडली, सहा महिने अपयश, पण आता कमावताहेत करोडो रुपये...

**आज भारतीय घरांमध्ये वॉटर प्युरिफायर (आरओ) सर्वसामान्य झाले असले तरी १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात परिस्थिती अशी नव्हती. बाजारात फक्त काही मोजकेच अल्ट्राव्हायोलेट (UV) प्युरिफायर होते, ज्यावर लोकांचा फारसा विश्वास नव्हता. स्वच्छ पाणी ही एक गरज होती, पण तो व्यावसाय बनला नव्हता. याच काळात मेकॅनिकल इंजिनिअर डॉ. महेश गुप्ता यांच्यासमोर एक असे संकट आले, ज्याने भारतातील जलशुद्धीकरण उद्योगाचे भविष्यच बदलून टाकले. आज, डॉ. गुप्ता हे केंट आरओ सिस्टीम्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत.**

### कंपनीची सुरुवात कशी झाली?

ही कहाणी एका भव्य व्यावसायिक योजनेने नव्हे, तर एका घरगुती समस्येने सुरू होते. दूषित पाणी प्यायल्यामुळे डॉ. महेश गुप्ता यांच्या मुलांना कावीळ झाली. इंजिनिअर म्हणून डॉ. गुप्ता यांनी मूळ कारणाचा शोध सुरू केला. ते सांगतात की, बाजारात उपलब्ध असलेले यूव्ही प्युरिफायर पाण्यात विरघळलेले हानिकारक कण काढून टाकण्यास असमर्थ होते. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) तंत्रज्ञान हाच एकमेव उपाय आहे. हे तंत्रज्ञान त्यावेळी भारतात उपलब्ध नव्हते, म्हणून त्यांनी अमेरिकेतून मेम्ब्रेन आणि पंपसारखे भाग आयात केले आणि घरीच पहिला प्युरिफायर तयार केला. जेव्हा ही प्रणाली यशस्वी ठरली, तेव्हा डॉ. गुप्ता यांच्या लक्षात आले की ज्या तंत्रज्ञानाने त्यांच्या कुटुंबाला मदत केली होती, त्याची देशभरात गरज आहे. येथूनच केंट आरओ सिस्टीम्सचा जन्म झाला.

### नोकरी सोडून धोका पत्करला...

आयआयटी कानपूरमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर डॉ. महेश गुप्ता इंडियन ऑइल (IOC) सारख्या एका प्रतिष्ठित सरकारी कंपनीत वर्ग-१ अधिकारी म्हणून कार्यरत होते. पण जेव्हा दूषित पाण्यामुळे त्यांचा मुलगा आजारी पडला, तेव्हा या कौटुंबिक संकटाने त्यांना नोकरी सोडून काहीतरी नवीन करण्याचा विचार करण्यास प्रेरित केले. त्यांनी धोका पत्करला आणि केवळ २०,००० रुपयांच्या अल्प भांडवलात व्यवसाय सुरू केला.

### रात्रंदिवस काम केले...

डॉ. गुप्ता यांनी सुरुवातीचे सहा महिने अथक परिश्रम घेतले, प्रत्येक शक्य तंत्रावर प्रयोग केले, पण त्यांना पाण्यातील अशुद्धी पूर्णपणे वेगळी करण्यात अपयश आले. या सुरुवातीच्या अपयशानंतरही त्यांनी हार मानली नाही आणि सहा महिन्यांच्या कठोर परिश्रमानंतर आणि तांत्रिक प्रयोगांनंतर, त्यांना अखेरीस परिपूर्ण सूत्र सापडले. जेव्हा केंटने भारतातील पहिला RO प्युरिफायर बाजारात आणला, तेव्हा त्याची किंमत सुमारे २० हजार रुपये होती. त्यावेळच्या पारंपरिक प्युरिफायरच्या तुलनेत तो अत्यंत महाग होता. किरकोळ विक्रेते आणि ग्राहक या महागड्या तंत्रज्ञानावर विश्वास ठेवत नव्हते. डॉ. गुप्ता यांनी एक मोठी जोखीम पत्करली. त्यांनी लहान दुकानांऐवजी, टीव्ही आणि रेफ्रिजरेटरसारख्या टिकाऊ ग्राहक वस्तूंजवळ मोठ्या शोरूममध्ये आपले प्युरिफायर प्रदर्शित करण्यास सुरुवात केली. ही रणनीती यशस्वी ठरली. ग्राहकांची धारणा झपाट्याने बदलली आणि वॉटर प्युरिफायर ही चैनीची वस्तू न राहता एक गरज बनली.



### 2025 मध्ये 1,260 कोटींचा महसूल

पाण्याच्या क्षेत्रात यश मिळवल्यानंतर, कंपनीने आपल्या शुद्धतेच्या तत्त्वज्ञानाचा विस्तार केला. आज, केंट केवळ वॉटर प्युरिफायरपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर एअर प्युरिफायर, स्मार्ट किचन उपकरणे आणि वेलनेस उत्पादनांमध्येही एक प्रमुख कंपनी बनली आहे. कंपनीचा आर्थिक वर्ष २०२४-२५ (FY25) मधील महसूल १,२६० कोटी होता. यापैकी १,०५० कोटी वॉटर प्युरिफायरमधून, १५० कोटी उपकरणांमधून आणि ७० कोटी पंख्यांमधून मिळाले.

# ओटीपी नाही, पिन नाही... फसवणूक करणारे AePS द्वारे तुमचे बँक खाते करतील रिकामे !

### फसवणूक टाळण्यासाठी जाणून घ्या 5 टिप्स...

**असे मानले जाते, की जोपर्यंत आपण आपला ओटीपी किंवा एटीएम पिन कोणालाही देत नाही, तोपर्यंत आपले बँक खाते पूर्णपणे सुरक्षित असते. पण सायबर गुन्हेगारांनी आता हा विश्वास तोडण्याचा एक नवीन मार्ग शोधला आहे. फसवणूक करणारे आता AePS या सरकारी सुविधेचा गैरफायदा घेत आहेत आणि कोणत्याही कोड किंवा पिनशिवाय लोकांच्या खात्यातून पैसे काढत आहेत. सायबर गुन्हे विश्लेषकांनी हे कसे टाळावे याबाबत सांगितले आहे.**



### अशी होते फसवणूक

- ही ओटीपी मुक्त सुविधा आता सायबर फसवणूक करणाऱ्यांसाठी एक मोठे शस्त्र बनली आहे. अनेकदा जेव्हा लोक जमीन नोंदणी किंवा इतर सरकारी कागदपत्रांसाठी आपली कागदपत्रे सादर करतात, तेव्हा ते आपल्या अंगठ्याच्या ठशांचाही वापर करतात. फसवणूक करणारे कसेतरी बोटांच्या ठशांचा तपशील चोरण्यात यशस्वी होतात. यानंतर, ते एक बनावट अंगठ्याचा ठसा तयार करतात.
- गुन्हेगार व्यक्तीचा आधार क्रमांक मायक्रो-एटीएम मशीनमध्ये टाकतात आणि स्कॅनरवर बनावट अंगठ्याचा ठसा ठेवतात. मशीनला वाटते की ती व्यक्ती पैसे काढत आहे. त्या व्यक्तीला कळण्यापूर्वीच थेट खात्यातून पैसे कापले जातात. या प्रकारच्या फसवणुकीबद्दल मोठ्या संख्येने तक्रारी राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल आणि १९३० वर प्राप्त होत आहेत.

### AePS म्हणजे काय?

AePS म्हणजे आधार एनेबल्ड पेमेंट सिस्टीम (Aadhaar Enabled Payment System). ज्यांना एटीएम कार्ड कसे वापरावे हे माहित नाही किंवा ज्यांना आपला पिन लक्षात ठेवण्यात अडचण येते, त्यांच्या सोयीसाठी हे विशेषतः तयार केले गेले आहे. या प्रणालीद्वारे फक्त आपला आधार क्रमांक देऊन आणि बायोमेट्रिक मशीनवर अंगठ्याचा ठसा उमटवून बँकेतून पैसे काढता येतात. यासाठी फोन किंवा ओटीपीची आवश्यकता नसते.

### फसवणूक टाळण्याचे 5 मार्ग

- तुमचे बायोमेट्रिक्स लॉक करा : हा सर्वात खात्रीशीर उपाय आहे. एम-आधार ॲप किंवा यूआयडीएआय (UIDAI) वेबसाइटला भेट देऊन तुमचे बायोमेट्रिक्स लॉक करा. जेव्हा तुम्हाला तुमच्या अंगठ्याच्या ठशाचा वापर करायचा असेल, तेव्हा ॲपमधून १० मिनिटांसाठी ते अनलॉक करा.
- तुमचा आधार शेअर करताना काळजी घ्या : तुमच्या आधारची छायाप्रत (फोटोकॉपी) कोणालाही कधीही देऊ नका. नेहमी त्यावर सही करा (स्व-साक्षांकित करा) आणि तुम्ही ते कोणत्या उद्देशाने देत आहात हे स्पष्टपणे नमूद करा. शक्य असल्यास, 'मास्क्ड आधार' वापरा, ज्यामध्ये तुमच्या आधारचे पहिले ८ अंक लपवलेले असतात.
- व्हर्च्युअल आधारचा वापर : तुम्ही तुमच्या पूर्ण आधार क्रमांकाऐवजी तुमचा १६-अंकी व्हर्च्युअल आयडी (VID) कुठेही वापरू शकता. तो सर्वत्र वैध आणि अत्यंत सुरक्षित आहे.
- आधार-पॅन लिंक : तुमचे बँक खाते आणि आर्थिक व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी, तुमचा आधार तुमच्या पॅन कार्डशी जोडलेला असल्याची खात्री करा.

# मराठवाड्यात मॉन्सूनपूर्व पावसाचा कहर! वादळी वाऱ्याने घरांची पत्रे उडाली, गारपिटीने फळबागांचे मोठे नुकसान



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** मराठवाड्यात रविवारी मॉन्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत अनेक जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेली, तर काही भागांत हरभऱ्याएवढ्या गारांचा वर्षाव झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक गावांमध्ये झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. मात्र या पावसामुळे गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या प्रचंड उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

**जालन्यात गारपिटीचा तडाखा**

जालना जिल्ह्यातील घनसावंगी आणि अंबड तालुक्यात बेमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली. घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी गारपीटही झाली. केळी, पपई आणि आंब्याच्या फळबागांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. वाऱ्यामुळे काही घरांवरील पत्रे उडून गेली असून नागरिकांना मोठा फटका बसला.

तीर्थपुरी शहरात रिमझिम सरी कोसळल्या, तर अंबड तालुक्यातील गोंदी शिवारात विजांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. शेतकऱ्यांनी उभ्या पिकांचे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली आहे.

**हिंगोलीत नागरिकांची तारांबळ**

हिंगोली जिल्ह्यातील औंढा, वसमतसह अनेक भागांत शनिवारी सायंकाळी जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे बाजारपेठांमध्ये नागरिकांची एकच धांदल उडाली. काही भागांत झाडे कोसळल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. सूर्यदर्शन होत नसल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता. त्यानंतर अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावत हवामानात मोठा बदल झाला.

**बीडमध्ये गारांचा वर्षाव**

बीड जिल्ह्यातील काही भागांतही पावसाने जोरदार हजेरी लावली. बीड तालुक्यातील म्हाळसापूर येथे गारपीट झाली. गारांच्या तडाख्यामुळे भाजीपाला आणि फळपिकांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. शेतकरी नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी करत आहेत.

**नांदेडमध्ये वादळी वाऱ्याने झाडे कोसळली**

नांदेड जिल्ह्यात अचानक हवामान बदलल्याने अनेक भागांत १५ ते २० मिनिटे जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. अनेक वाहनचालकांना रस्त्यावर अडचणींचा सामना करावा लागला. काही भागांत धुळीचे वादळही पाहायला मिळाले.

**परभणीत रस्त्यांवर पाणीच पाणी**

परभणी शहर आणि परिसरात विजांच्या कडकडाटासह जोरदार सरी कोसळल्या. शहरातील अनेक नाल्या तुंबल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर आले. काही सखल भागांत पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली.

दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे. वादळी वारे आणि विजांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे

# बंगाल सरकारचा निर्णय; आता बंगालमधील मदरशांमध्ये 'वंदे मातरम' गायन अनिवार्य

**कोलकाता (प्रतिनिधी) –** पश्चिम बंगालमधील शुभेंदू सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. बंगाल सरकारच्या अल्पसंख्याक कार्य आणि मदरसा शिक्षण विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, राज्यातील सर्व मदरसांमध्ये आता 'वंदे मातरम्' गायन अनिवार्य करण्यात आले आहे. सरकारी, अनुदानित तसेच विनाअनुदानित सर्व मदरसांना हा आदेश लागू असेल आणि त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

यापूर्वी गेल्या आठवड्यात शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना एक नोटीस जारी करून दररोज वर्ग सुरू होण्यापूर्वी 'वंदे मातरम्' गायन सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते. आदेशात म्हटले होते की, सकाळच्या प्रार्थना सभेमध्ये 'वंदे मातरम्'चे गायन अनिवार्य करण्यात यावे, जेणेकरून राज्यातील सर्व विद्यार्थी तत्काळ प्रभावाने हे गीत गातील. राज्य सरकारचा हा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाने जानेवारी महिन्यात जारी केलेल्या त्या निर्देशानंतर आला आहे, ज्यामध्ये राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या १५० वर्षपूर्तीच्या निमित्ताने त्याचे गायन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

यापूर्वीच्या व्यवस्थेनुसार शाळांच्या सकाळच्या प्रार्थना सभेत (बांग्लार माटी बांग्लार जल) हे गीत गायन अनिवार्य होते. मात्र, नव्या आदेशात हे स्पष्ट करण्यात आलेले नाही की राज्यगीत आता 'वंदे मातरम्' आणि राष्ट्रगीतासोबत कायम ठेवले जाणार की नाही.काही शाळांच्या मुख्याध्यापकांनी या निर्णयाबाबत व्यावहारिक अडचणींचा मुद्दा उपस्थित केला आहे. एका शाळा प्रमुखांनी सांगितले की, आम्ही राष्ट्रगीत काढून टाकू शकत नाही, कारण ते अनिवार्य आहे. आता प्रथम 'वंदे मातरम्' गायले जाईल आणि त्यात राज्यगीतही जोडले गेले, तर अधिक वेळ लागेल. त्यामुळे वर्ग सुरू होण्यास उशीर होऊ शकतो. नोटीसमध्ये राज्यगीताबाबत काहीही स्पष्ट केलेले नाही. विद्यार्थ्यांना सलग तीन गीते म्हणण्यासाठी थांबवणे सोपे नाही. शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, नव्या निर्देशात केवळ 'वंदे मातरम्'बाबत आदेश देण्यात आले आहेत. अधिकाऱ्याने म्हटले, आम्हाला शालेय प्रार्थनेचा भाग म्हणून 'वंदे मातरम्' सुरू करण्यास सांगितले आहे. मात्र, राज्यगीताचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.दरम्यान, अनेक शाळांनी या आदेशाची अंमलबजावणी सुरूही केली आहे.

# युवाशक्ती राष्ट्रशक्ती, सरकारने त्यांना प्रोत्साहन द्यायला हवं! कॉकरोच जनता पार्टीबाबत अण्णा हजारेंचा केंद्र सरकारला सल्ला

**जळगाव (प्रतिनिधी) –** देशभरात गेल्या आठवडाभरापासून सोशल मीडियातील पॉवर दाखवून देणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या अकाऊंटची आणि त्याचे संस्थापक अभिजीत दिपकेंची जोरदार चर्चा सुरु आहे. एकेकाळी अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचा भाग राहिलेल्या अभिजीत दिपकेच्या या पक्षाबाबत अण्णा हजारेंना विचारण्यात आल्यानंतर त्यांनी कॉकरोच जनता पार्टीचं समर्थन केलं. झुरळ हे नाव योग्य नसलं तरी देशातील जनता या पार्टीच्या पाठीशी उभी आहे, असे अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

अण्णा हजारेंच्या या वक्तव्यावर भाजप नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लवकरच मी अण्णा हजारेंची भेट घेणार असल्याचं महाजन यांनी म्हटलं.

कॉकरोच जनता पार्टीच्या संस्थापकांनी सरन्यायाधीशांच्या वक्तव्याचा निषेध करत कॉकरोच



जनता पार्टी असे नाव ठेवून सोशल मीडियात अकाऊंट बनवलं होतं, अवघ्या ५ दिवसांतच या अकाऊंटवर १ कोटीपेक्षा जास्त फॉलोअर्स झाल्याने देशभरात याची चर्चा सुरू होती. अनेक राजकीय पक्षांनी या पार्टीचं समर्थन करताना, ही देशातील तरुणाईची भावना असल्याचे म्हटले. आता, अण्णा हजारे यांनीही याबाबत आपलं मत मांडलं आहे. झुरळ हे नाव योग्य नसलं तरी देशातील जनता या पार्टीच्या पाठीशी उभी आहे, असे अण्णांनी म्हटलं. मुळात हे समजून घेतलं पाहिजे की, या पार्टीने झुरळ म्हणण्याचा उद्देश काय होता? नाव योग्य नसेल तरी झुरळ पार्टीच्या मागे देशातील तरुण उभा राहिला हे महत्त्वाचे आहे. युवाशक्ती ही राष्ट्रशक्ती आहे, या दोन्हीचा संगम होतो तेव्हा सरकारने त्याचा अव्हेर न करता त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे, असा सल्ला अण्णा हजारे यांनी दिला.

आण्णा हजारेंच्या या वक्तव्यावरुन आता भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. मी लवकरच अण्णा हजारे यांची भेट घेणार आहे, अनेक वर्षांपासून त्यांची माझी भेट नाही, असे महाजन यांनी म्हटले. मात्र, आण्णा हजारेंच्या या वक्तव्यावरुन आता भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. मी लवकरच अण्णा हजारे यांची भेट घेणार आहे, अनेक वर्षांपासून त्यांची माझी भेट नाही, असे महाजन यांनी म्हटले. मात्र, कॉकरोच जनता पार्टी आणि लोकायुक्त अंमलबजावणीसंदर्भातील वक्तव्यावर स्पष्टपणे उत्तर देणं महाजन यांनी टाळलं आहे.

# अनधिकृत बांधकाम प्रकरणी शिवराज मोटेगावकरांना जिल्हाधिकाऱ्यांची नोटीस



**लातूर (प्रतिनिधी) –** लातूर ग्रामीणमधील खोपेगाव ग्राम पंचायत हद्दीतील गट क्रमांक ११४ मधील बांधकाम प्रकरणी विकासक डहळींरक्ष चींशसरेपज्ञरी यांना जिल्हाधिकारी डॉ. भारत बस्तेवाड यांनी २१ मे रोजी नोटीस बजावली आहे. बांधकाम परवानगीसाठी मंजूर करण्यात आलेल्या नकाशातील बांधकाम क्षेत्र आणि अंतिम अभिन्यास मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या सीमांकन नकाशातील बांधकाम क्षेत्रामध्ये मोठी तफावत आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

नोटिशीनुसार, अनधिकृत बांधकामाबाबत विकासकाने शासनाकडे तडजोड शुल्क जमा केल्यास पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल. तसेच नगररचना विभागाने यापूर्वीच बीपीएमएस प्रणालीद्वारे सुधारित बांधकाम नकाशे सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र अद्याप सुधारित नकाशे सादर करण्यात आलेले नाहीत.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, नगररचना विभागाकडून अंतिम अहवाल आणि तडजोड शुल्काची रक्कम निश्चित होईपर्यंत पुढील प्रक्रिया होणार नाही. तसेच सुधारित नकाशे सादर केल्याशिवाय शुल्काची रक्कमही निश्चित केली जाणार नाही. त्यामुळे एका महिन्याच्या आत सुधारित बांधकाम नकाशे नगररचना विभागाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून आदेशाचे पालन न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित चौकशीची चर्चा दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीदरम्यान शुक्रवारी काही व्यक्तींची चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधितांचा या प्रकरणाशी थेट संबंध असल्याचे ठोस पुरावे मिळाल्याशिवाय सीबीआय त्यांना ताब्यात घेणार नाही. एका व्यक्तीकडे त्यांच्या मुलांच्या नीट परीक्षेच्या तयारीसंदर्भातील कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती. मात्र संबंधितांनी शैक्षणिक साहित्य आणि कागदपत्रे रद्दीत गेल्याचे सांगितले. त्यानंतर संबंधित रद्दी विक्रेत्यालाही चौकशीसाठी बोलावण्यात आले. त्याने १२ रुपयांची रद्दी पुढे विकल्याचे सांगितल्याने संबंधित कागदपत्रांचा मागोवा लागू शकला नसल्याची चर्चा सध्या लातूरमध्ये रंगत आहे.

# बारामुल्लामध्ये सुरक्षा दलांची कारवाई; दहशतवाद्यांच्या ठिकाणाहून स्फोटक साठा जप्त

**श्रीनगर (वृत्तसंस्था) –** उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत दहशतवाद्यांच्या संशयित ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात स्फोटक दारुगोळा जप्त केला आहे. या कारवाईमुळे संभाव्य दहशतवादी कट उधळण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले असून परिसरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

अधिकृत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बारामुल्ला जिल्ह्यातील नीलसर कांडी परिसरात दहशतवाद्यांची हालचाल असल्याची गुप्त माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर बारामुल्ला पोलीस, ५२ राष्ट्रीय रायफल्स आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (उठझऋ) यांनी संयुक्त शोधमोहीम राबवली. घनदाट जंगल आणि डोंगराळ भागात अनेक तास चाललेल्या या कारवाईदरम्यान सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणाचा शोध घेत मोठा शस्त्रसाठा जप्त केला.

या मोहिमेत १४ राउंड ओजी-७व्ही रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड (ठझऋ) आणि ९ राउंड पीजी-७पी रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड जप्त करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य सापडल्याने सुरक्षा यंत्रणांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. प्राथमिक तपासानुसार, हा साठा सुरक्षा दलांवर मोठा हल्ला घडवून आणण्यासाठी वापरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुरक्षा दलांनी जप्त केलेला हा स्फोटक साठा अत्यंत धोकादायक स्वरूपाचा असून त्याचा वापर लष्करी वाहनांवर किंवा सुरक्षा चौक्यांवर हल्ल्यासाठी केला जाऊ शकतो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईनंतर परिसरात अतिरिक्त सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून संशयित दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी कॉम्बिंग ऑपरेशन अधिक तीव्र करण्यात आले आहे.

दरम्यान, वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांनी या संयुक्त कारवाईचे कौतुक केले आहे. पोलीस, सेना आणि सीआरपीएफ यांच्यातील समन्वयामुळेच ही मोठी कारवाई यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले. उत्तर काश्मीरमध्ये शांतता आणि सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या समन्वित मोहिमा सातत्याने राबवल्या जात आहेत. दहशतवाद्यांचे कोणतेही षड्यंत्र हाणून पाडण्यासाठी सुरक्षा दल पूर्णपणे सज्ज आहेत, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही महिन्यांपासून जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादविरोधी कारवाया अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. विशेषतः उत्तर काश्मीरमधील सीमावर्ती भागांत दहशतवादी घुसखोरी रोखण्यासाठी आणि त्यांच्या नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी सुरक्षा दलांकडून सातत्याने शोधमोहीम राबवण्यात येत आहे. बारामुल्लामधील ही कारवाई त्याच मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग मानली जात आहे.

# राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा भरपूर, शेतकऱ्यांनी विनाकारण घाई करू नये; कृषीमंत्री दत्तात्रय भरणेंचं आवाहन





**सोलापूर (प्रतिनिधी) –** राज्यात पेट्रोल डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने पेट्रोल पंपांवर रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. परभणीत तर भलीमोठी रांग लागली असताना चक्क पेट्रोल-डिझेलचे ड्रम घेऊन हाणामारी झाल्याचं पाहायला मिळालं. एकीकडे शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी डिझेल मिळेना झालंय, तर दुसरीकडे वाळू माफियांना तब्बल २५ हजार रुपयांचे डिझेल विक्री होत असल्याचाही प्रकार समोर आला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. त्यातच, शेतकऱ्यांनी ज्यावेळी लागेल त्यावेळेसच पेट्रोल डिझेल घ्यावे, साठा करू नये, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलंय.

दत्तात्रय भरणे पंढरीत विठ्ठल दर्शनासाठी आले असता, हवामान खात्याचा अंदाज चुकीचा ठरवून राज्यात धो धो पाऊस पडू दे असे साकडे त्यांनी पांडुरंगाला घातले. यावेळी, पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना, राज्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा साठा मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. शेतकऱ्यांनी कुठल्याही प्रकारची घाई गडबड करू नये. ज्यावेळेस पेट्रोल डिझेल लागेल त्यावेळेसच घ्यावे. उगाच साठवणूक करू नये, असे आवाहन दत्तात्रय भरणे यांनी पंढरीतून केले आहे.


**जळगावात जिल्हाधिकारी पेट्रोल पंपावर**

दरम्यान, एकीकडे राज्यात पेट्रोल-डिझेलचा साठा मुबलक असल्याचे दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे. मात्र, जळगाव शहरात डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याने चक्क जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी संयुक्तरित्या विविध पेट्रोल पंपांची पाहणी केली. काही ठिकाणी पोलिस बंदोबस्तात डिझेलचे वितरण सुरू असल्याचेही यावेळी पाहायला मिळाले. यावेळी प्रशासनाने पेट्रोल व डिझेलचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत नागरिकांनी गोंधळून जाऊ नये, असे आवाहन केले. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने बाटल्या किंवा कॅनमध्ये पेट्रोल-डिझेल देऊ नये, असे निर्देश पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी संबंधितांना दिले.

**पेट्रोल पंपावर ग्राहकांना कुपण वाटप**

बुलढाणा जिल्ह्यात डिझेल टंचाईने हाहाकार उडवला असून अनेक पंपावर ट्रॅक्टर व वाहनाच्या अद्याप रांगा कायम आहेत. पंपचालक, ग्राहक तसेच पंप कर्मचारी यांच्यात वाद, हाणामारीच्या घटना वाढतच आहेत. या सगळ्यांना फाटा देत मेहकर ते चिखली मार्गावरील काठोळे या पंप चालकाने वाद, हाणामारी, गर्दी टाळण्यासाठी शक्कल लढविली असून डिझेल भरण्यासाठी आलेल्या ग्राहकाला चक्क कूपन वाटप करणे सुरू केल आहे. मागील चार पाच दिवसांपासून ही शक्कल लढवल्याने पंपावरील गर्दी कमी झाली, वाद, हाणामारी यासारख्या घटनांना सुद्धा आळा बसला आहे. कुपन दाखविल्यावरच ग्राहकांना डिझेल किंवा पेट्रोल मिळतं, याशिवाय दरदिवशी २०० कूपन वाटत असल्याने आलेल्या प्रत्येक ग्राहकांना डिझेल मिळत असल्याने त्यांचेही समाधान होत आहे.

# अमेरिकेला युरेनियम देण्यास इराणचा स्पष्ट नकार



**नवीदिल्ली (वृत्तसंस्था) –** उच्च संवर्धित युरेनियमचा साठा अमेरिकेला देणार नसल्याचे इराणने स्पष्ट केलं आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, एका वरिष्ठ इराणी अधिकाऱ्याने सांगितले की, सध्याच्या प्राथमिक करारामध्ये अणुऊर्जा विषयाचा समावेश नाही. सूत्रांनुसार, इराणच्या अणुकार्यक्रमावर आणि युरेनियम साठ्यावर अंतिम करारादरम्यान नंतर वाटाघाटी होतील. सध्या, देशातून युरेनियम बाहेर पाठवले जाईल की नाही यावर कोणताही निर्णय झालेला नाही.

यापूर्वी, अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी काल सांगितले होते की, अमेरिका इराणला उच्च संवर्धित युरेनियम ठेवू देणार नाही. ते म्हणाले, आम्ही ते मिळवू, इराणला ते ठेवू देणार नाही. अलीकडील वृत्तांमध्ये असा दावा करण्यात आला होता की इराणने आपला युरेनियम साठा देण्यास सहमती दर्शवली आहे. तथापि, इराणी बाजूने आता ही वृत्ते फेटाळून लावली आहेत.

अमेरिका प्रामाणिक नाही - इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी आसिम मुनीर यांच्यासोबतच्या बैठकीत सांगितले की, अमेरिका प्रामाणिक नाही आणि इराण आपल्या हक्कांबाबत तडजोड करणार नाही.

इराण वाटाघाटींमध्ये इस्रायलची भूमिका मर्यादित - न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, ट्रम्प प्रशासनाने इराण वाटाघाटींमध्ये इस्रायलची भूमिका मर्यादित केली आहे, ज्यामुळे पंतप्रधान नेतान्याहू यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे.

ट्रम्प यांच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी - एफबीआयने इराकी नागरिक मोहम्मद बाकेर साद दाऊद अल-सादीला अटक केली आहे, ज्याने इव्हांका ट्रम्प यांच्या हत्येची धमकी दिल्याचा आरोप आहे.

अमेरिका अतिशयोक्ती करत आहे - रशियन अधिकारी मिखाईल उल्यानोव्ह म्हणाले की, अमेरिका इराण वाटाघाटींमधील घडामोडींची अतिशयोक्ती करत आहे, तर वास्तविक परिस्थिती तितकी सकारात्मक नाही.

भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा वाढ - मध्य-पूर्वेतील संकट आणि वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे, भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा वाढ झाली असून, दिल्लीत पेट्रोल ९९.५१ रुपये आणि डिझेल ९२.४९ रुपयांवर पोहोचले आहे.

इराणची वृत्तसंस्था 'फर्स'च्या वृत्तानुसार, अमेरिका आणि इराण यांच्यात तयार होत असलेल्या कराराच्या मसुद्यात असे म्हटले आहे की, अमेरिका आणि इस्रायल इराण किंवा त्याच्या इराण-समर्थक गटांवर हल्ला करणार नाहीत. त्या बदल्यात, इराण अमेरिका आणि इस्रायलवर प्रथम हल्ला न करण्याचे वचनही देईल. क्सिऑसच्या अहवालानुसार, या करारामध्ये इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील सुरू असलेला संघर्ष संपुष्टात आणला जाईल, हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. अहवालात म्हटले आहे की, जर हिजबुल्लाहने पुन्हा हल्ला केला किंवा हल्ला सुरू केला, तर इस्रायलला प्रत्युत्तर देण्याची परवानगी दिली जाईल.

# ४ महिलांचा बळी घेणारी टी-२ वाघीण अखेर जेरबंद

**चंद्रपूर (प्रतिनिधी) –** चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रात चार महिलांचा बळी घेणाऱ्या टी-२ वाघिणीला अखेर वनविभागाने शनिवारी रात्री जेरबंद करण्यात यश मिळवले. गुंजेवाही जंगल परिसरात पार पडलेल्या या थरारक कारवाईनंतर स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. गेल्या काही दिवसांपासून या नरभक्षक वाघिणीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

शुक्रवार २२ मे रोजी गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या १३ महिलांच्या गटावर टी-२ वाघिणीने अचानक हल्ला चढवला होता. दबा धरून बसलेल्या वाघिणीच्या हल्ल्यात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर मानवी जीवितहानी झाल्याची ही महाराष्ट्रातील दुर्मिळ आणि धक्कादायक घटना मानली जात आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. वनविभागाने तातडीने कारवाई करून वाघिणीचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरत होती.

या हल्ल्यानंतर वनविभागाने विशेष पथक तयार करून गुंजेवाही-पवनपार मार्गावरील खैरीचक जंगल परिसरात मोठी शोधमोहीम सुरू केली. संबंधित वाघिणीला पकडण्यासाठी आवश्यक परवानग्या घेत ट्रॅप आणि ट्रॅन्क्युलायझरची व्यवस्था करण्यात आली होती. वनअधिकाऱ्यांनी जंगलातील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत ऑपरेशन युद्धपातळीवर राबवले.


## Change In Name

My Old Name is **BIYANI KIRTI GOWARDHANDAS** which now I am changing as New Name **KIRTI SANTOSH LOHIYA.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - R/o 3-544-11 Virndavan Nagar Old Kautha Nanded-Maharashtra-431603**

**M0. No. 8766966617**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## लाचलुचपत विभागाचे डीवायएसपी प्रशांत पवार यांची बदली

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कार्यरत असलेले पोलीस उपाधीक्षक प्रशांत पवार यांची अखेर छत्रपती संभाजीनगर येथील याच विभागात बदली करण्यात आली आहे.

राज्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक (मुख्यालय-२) चे अरुण पाटील यांनी २२ मे रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या आस्थापनावरील १३ अधिकाऱ्यांच्या विभागांतर्गत बदल्या केल्या आहेत. त्या बदल्यांमध्ये पोलीस उपाधीक्षक प्रशांत पवार यांचीही बदली करण्यात आली आहे. त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे याच विभागात पाठविण्यात आले आहे. तर त्यांच्या रिक्त जागेवर लातूर येथून संतोष बर्गे यांना पाठविण्यात आले आहे.

## रेल्वे टीसींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; संरक्षण व मूलभूत सुविधा देण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** – रेल्वे प्रवाशांच्या सुविधा व सुरक्षेसाठी दिवसरात्र सेवा देणाऱ्या तिकीट तपासणीस (टीसी) कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, त्यांना आवश्यक संरक्षण व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी इंडियन रेल्वे तिकीट चेकिंग स्टाफ ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय सिंग यांनी केली.

इंडियन रेल्वे तिकीट चेकिंग स्टाफ ऑर्गनायझेशनच्या वतीने नांदेड येथील विभागीय कार्यालय परिसरातील सभागृहात दुसऱ्या विभागीय तिकीट चेकिंग कर्मचारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना संजय सिंग यांनी टीसी कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील अडचणी आणि सुरक्षेच्या समस्यांकडे लक्ष वेधले.

ते म्हणाले की, रेल्वेच्या विकासात तसेच प्रवाशांना सुरक्षित आणि सुलभ सेवा देण्यात तिकीट तपासनीस कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. रेल्वे प्रवासादरम्यान अनेकदा नियमभंग करणारे किंवा गुंड प्रवृत्तीचे प्रवासी टीसी कर्मचाऱ्यांशी वाद घालतात, धमकावण्याचा प्रयत्न करतात. काही प्रकरणांमध्ये मोबाईलवर दिशाभूल करणारे व्हीडीओ तयार करून कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचे प्रकारही समोर येत असल्याने रेल्वे प्रशासनाने याबाबत ठोस पावले उचलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

संघटना देशभरातील तिकीट तपासनीस कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने काम करत असून, प्रलंबित मागण्यांसाठी शासन व रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नांदेड विभागाच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमास उपाध्यक्ष हेमंत वेदपाठक, राष्ट्रीय संयुक्त सचिव खालिद हुसेन, मंडल सचिव प्रदीप जोहरे, मंडल अध्यक्ष सय्यद लियाकत, विभागीय कोषध्यक्ष जी. महतो, यू. व्यंकटेशलू तसेच रेल मजदूर युनियनचे मंडल सचिव राम प्रभू यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जी. महतो यांनी केले, तर किरण जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत व आभार मानले. मेळाव्यास विभागातील मोठ्या संख्येने तिकीट तपासणीस कर्मचारी उपस्थित होते.

## हिप्परगा शिवारात पाच किलो गांजाचे झाड जप्त; गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)**–मुखेड तालुक्यातील हिप्परगा शिवारात गांजाची झाडे असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या ठिकाणी कारवाई केली. यावेळी त्यांच्या हाती फक्त एक पाच किलो वजनाचे गांजाचे झाड लागले. पथकाने सदरचे झाड जप्त करून ज्येष्ठ नागरिकास ताब्यात घेतले आहे.

अंमली पदार्थाची माहिती काढून अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना एसपी अबिनाश कुमार यांनी दिल्या होत्या. त्यावरून भासेले यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याबाबत आदेशीत केले. दि. २२ मे रोजी स्था.गु.शा. येथील ग्रेड पोउपनि बळीराम दासरे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना मुखेड हद्दीतील हिप्परगा (दे) शिवारातील गोविंद केरचा शिकारे यांने त्यांच्या शेतात एन.डी.पी.एस. ॲक्ट च्या तरतुदीचा भंग करून गांजाची झाडे चोरटी विक्री करण्यासाठी लावली आहेत. अशी गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून सदरची माहिती वरिष्ठांना देऊन वरिष्ठांच्या परवानगीने राजपत्रीत अधिकारी, शासकीय पंच व स्टाफसह रवाना होऊन हिप्परगा (दे) ता. मुखेड शिवारातील गोविंद केरचा शिकारे याचे शेतात छापा मारला.

गोविंद केरबा शिकारे (वय ६७ वर्षे, रा. हिप्परगा (दे) ता. मुखेड) हा मिळून आला. त्याच्या शेताची पाहणी केली असता हिरव्या रंगाची पाने, बोंडे असलेले अंमली पदार्थ गांजाचे एक झाड वजन ५ किलो १९० ग्रॅम किंमती १ लाख ३ हजार ८०० रूपयाचे मिळून आल्याने जप्त करून मुद्देमाल व आरोपी पो. स्टे. मुखेड यांचे ताब्यात देऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गाडीपुरा येथील श्री क्षत्रिय समाज संस्थेची निवडणूक रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री क्षत्रिय समाज, गाडीपुरा नांदेड या संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकाबाबत धर्मदाय सहआयुक्त यांनी वेळोवेळी आदेश करून, मागील मंजूर फेरफार अर्जातील एकूण सदस्य संख्या १,८३८ एवढ्याच संख्येतून निवडणूक घेण्याबाबतचे आदेश निवडणूक अधिकारी यांना दिलेले होते. मात्र ही निवडणूक अखेर रद्द करण्यात आली आहे.

या संस्थेचा निवडणूक कार्यक्रम दि. ३० एप्रिल रोजी निवडणूक जाहीर करण्यात आला व दि. २३ मे २०२६ रोजी निवडणूक घेण्यात येणार होती. दि. ८ मे २०२६ रोजी एकूण १,८३८ सभासदांची यादी जाहीर करण्यात आली. सदरील यादीवर फक्त आक्षेप स्वीकारण्यात आले आणि निवडणूक अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता दि. १२ मे २०२६ रोजी फक्त ६७९ सभासदांची चुकीची अंतिम यादी लावली होती. सदरील यादीमुळे अनेक कायदेशीर सभासदांवर अन्याय झाला. या गैरकायदेशीर कृत्याच्या विरुद्ध महेंद्रसिंह दिलीपसिंह ठाकूर यांनी तत्काळ उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे धाव घेऊन दाद मागीतली आणि निवडणूक प्रक्रिया चुकीची असल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आल्याने न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेला तत्काळ स्थगिती आदेश दिला.

या आदेशामुळे समाजातील अनेक व्यक्तींना न्याय मिळाला आहे. या प्रकरणासंबंधी याचिका ॲड. मृगेश नरवाडकर यांनी दाखल केली व न्यायालयात भक्कम बाज मांडून निवडणूक प्रक्रियेला स्थगिती मिळवून दिली. त्यांना सहकार्य ॲड. चंद्रशेखर नरवाडे यांनी केले आहे. या आदेशामुळे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## अर्धापूर तालुक्यातील नदी-नाल्यांना पाणी सोडण्याचे खा. अशोकराव चव्हाण यांच्या सूचना



**अर्धापूर(प्रतिनिधी)** –तालुक्यात ४४ डिग्रीच्या वर तापमानाची कडक उन्हाची दाहकता पाहता नदी-नाले कोरडे पडल्याने एका शिष्टमंडळाने माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांची भेट घेतली. या शिष्टमंडळाने तालुक्यातील नदी - नाल्यांना पाणी सोडण्याची मागणी केली. याविषयी दखल घेऊन तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना पाणी सोडवण्याच्या सूचना खा. अशोकराव चव्हाण यांनी दिल्या. यावेळी आ. ॲड. श्रीजया चव्हाण यांची उपस्थिती होती.

अर्धापूर तालुका बागायती आहे. उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे पाणी तालुक्यात येते. सध्या पाण्याचे आवर्तन सुरू आहे. तापमान ४४ डिग्रीपर्यंत चालले आहे. त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खालावली आहे. तेव्हा सर्वत्र पाणी टंचाईदृश्य परिस्थिती आहे. केळी पिकाला शेवटचे एक पाणी पाळी झाल्यासच केळीचे पीक येऊ शकते अन्यथा नाही. पिण्याच्या पाण्यासाठी पाणी पातळी खोल गेल्याने भटकंती करावी लागत आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे कृषी ऊत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, प्रभारी किशोर स्वामी, तालुकाध्यक्ष बालाजी पाटील गव्हाणे, कृऊबा संचालक निळकंठराव मदने, बाळू पाटील धुमाळ, नामदेव दुधाटे यांच्या शिष्टमंडळाने विमानतळावर खा. अशोकराव चव्हाण यांना भेटून अर्धापूर तालुक्यातील नदी- नाल्यांना इसापूर धरणाचे पाणी सोडण्याची मागणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना सुरू असलेल्या पाण्याच्या आवर्तनातून त्वरित नदी-नाल्यांना पाणी सोडण्याच्या सूचना खा. अशोकराव चव्हाण यांनी दिल्या. त्यामुळे आता अर्धापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना व जनतेला दिलासा मिळणार आहे.

## पाटबंधारे विभागाची भिंत पाडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –नायगाव येथे पाटबंधारे विभागाची कुठलीही परवानगी न घेता निरीक्षक बंगल्याची ६३ मीटर सुरक्षा भिंत पाडून शासकीय मालमत्तेचे जवळपास ११ लाख रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी शारदा कन्स्ट्रक्शनच्या सुनील मोरे विरुद्ध नायगाव ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**११ लाखांच्या शासकीय मालमत्तेचे नुकसान**

पाटबंधारे विभागाचे निरीक्षक बंगल्याभोवती असलेली सन १९६६ ते १९६७ मध्ये बांधण्यात आलेली भिंत शासनाची परवानगी न घेता व कोणतीही पूर्वसूचना न देता पाडून अकरा लाख रुपयांच्या शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. याप्रकरणी पाटबंधारे विभागाचे कालवा निरीक्षक चंद्रप्रकाश हसनाबादे यांच्या फिर्यादीवरून नायगाव पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक पोमनाळकर करीत आहेत.

## अभिवक्ता संघाचे ॲड. अर्धापूरकर अ. भा. ब्राह्मण महासंघातर्फे सन्मानित

**नांदेड (प्रतिनिधी)** –समाजकार्य, न्यायनिष्ठा आणि वैचारिक बांधिलकी यांचा सुंदर संगम जपणारे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. यदुपत अर्धापूरकर यांचा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने नुकताच विशेष सत्कार करण्यात आला. अभिवक्ता संघ नांदेडच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानिमित्त आयोजित या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या हस्ते खारीक-खोबऱ्याचा हार घालून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी 'रामसेवक' पुरस्कारप्राप्त ॲड. व्यंकटेश पाटणूरकर, डॉ. स्वप्नील पाटणूरकर, प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, पत्रकार संतोष कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी ॲड. अर्धापूरकर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या सामाजिक जाणिवा, न्यायालयीन अभ्यास आणि सेवाभावी वृत्तीचा विशेष उल्लेख केला.



गेल्या पंचवीस वर्षांपासून नांदेड येथे यशस्वीपणे वकिली व्यवसाय करणारे ॲड. अर्धापूरकर यांनी आपल्या कारकिर्दीत न्यायव्यवस्थेत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आहेत. नागपूर येथे दोन वर्षे न्यायाधीश म्हणून काम पाहताना त्यांनी न्यायनिष्ठेचा आदर्श निर्माण केला, तर नांदेड न्यायालयात तीन वर्षे सरकारी वकील म्हणून कार्य करताना सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोलाचे योगदान दिले होते.

शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांची कार्यतत्परता उल्लेखनीय राहिली आहे. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीवर सलग तीन टर्म सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले असून, हनुमान टेकडी बालक मंदिर शाळेचे सचिव म्हणून ते आजही कार्यरत आहेत. तसेच संध्याछाया वृद्धाश्रमाशी निगडित राहून सामाजिक संवेदनशीलतेची जपणूक त्यांनी सातत्याने केली आहे.

कर्तृत्व, संयम आणि सेवाभाव यांच्या बळावर उभा राहिलेला हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, नुकत्याच प्राप्त झालेल्या 'ब्रह्मभूषण' पुरस्काराने त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे

## जिल्हा अभिवक्ता संघाच्यावतीने न्यायाधीशांचा निरोप समारंभ संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील जिल्हा न्यायालयाच्या बँक्वेट हॉल येथे शनिवार, दि. २३ मे रोजी जिल्हा अभिवक्ता संघाच्या वतीने मागील तीन वर्षांपासून कार्यरत असलेल्या आणि आता बदलीवर जात असलेल्या न्यायाधिशांचा निरोप समारंभ व सुसंवाद कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून न्यायाधीश आणि वकील यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यावर मान्यवरांनी भर दिला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. एस. एन. हाके होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून न्यायाधीश टी. एस. सोलनकर उपस्थित होते. तसेच न्यायाधीश डॉ. एस. डी. तावशीकर, न्यायाधीश श्रीमती आर. एम. शिंदे आणि न्यायाधीश एस. डी. इंदलकर यांचा सत्कारमूर्ती म्हणून गौरव करण्यात आला. याशिवाय, न्यायाधीश बोराळकर आणि न्यायाधीश अमृत चव्हाण, मंडळाच्या न्या. मनीषा राठोड यांनीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावली होती.

यावेळी विचार मंचावर नांदेड जिल्हा अभिवक्ता संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर, सचिव ॲड. कपिल पाटील आणि महिला उपाध्यक्ष ॲड. सुजाता बगाटे, उपाध्यक्ष ॲड, देलमाडे, ॲड. वाकोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविक ॲड. यदुपत अर्धापूरकर यांनी केले. ते म्हणाले की, नांदेडमध्ये न्यायाधीशांना काम करण्यासाठी अत्यंत पोषक आणि चांगले वातावरण मिळते. त्यामुळे अपेक्षेपेक्षा जास्त प्रकरणांचा निकाल (डिस्पोजल) लागतो. न्यायाधीश आणि वकील वर्गात सतत संवाद आणि सुसंवाद राहावा, या हेतूनेच अशा स्नेहसंमेलनांचे आयोजन करण्यात येते, असे त्यांनी नमूद केले.

नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. पी. एन. शिंदे, ॲड. बी. आर. भोसले, ॲड. सय्यद अरिबुद्दीन, ॲड. व्यंकटेश पाटनूरकर, ॲड. रहेमान सिद्दीकी आणि ॲड. संजय वाकडे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. विशेषतः न्या. तावशीकर यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीचे सर्वांनी कौतुक केले. त्यांनी भविष्यात प्रमुख जिल्हा न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्यायमूर्ती व्हावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. न्यायाधीशांचे अनुभव आणि मार्गदर्शन निरोप घेणाऱ्या न्यायाधीशांनी नांदेडमधील आपल्या कामाच्या अनुभवाबद्दल गौरवोद्गार काढलेः

नांदेडमधील वकील वर्गाच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले. निकाल कोणताही लागो, परंतु येथील ज्येष्ठ आणि कनिष्ठ वकील कामात कधीही दिरंगाई करत नाहीत, ही विशेष बाब त्यांनी अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, नांदेडमधील एक वर्षाचा काळ कसा संपला हे कळलेच नाही. येथील वकील कायदे बाबींमध्ये न्यायाधीशांच्या काही चुका होत असल्यास त्या स्पष्टपणे सांगण्याची हिंमत ठेवतात.

यावेळी यदुपत अर्धापूरकर म्हणाले की, नांदेडचे वकील कायद्याच्या तत्त्वांचे पालन करून कामकाज करण्यासाठी सदैव कटिबद्ध आहेत. वकिलांकडून कोणतेही काम चुकीच्या मार्गाने केले जात नाही आणि पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी ते न्यायाधीशांना पूर्ण सहकार्य करतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. मुक्ताई पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिव ॲड. कपिल पाटील यांनी मानले.

या कार्यक्रमाला नांदेड जिल्ह्यातील वकील बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिमी...

प्रवास करताना नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी स्वतःच्या व पाळीव प्राण्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागातर्फे करण्यात आले आहे.

### एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर...

एकनाथ शिंदे हे चर्चेसाठी दिल्लीत गेलेत अशा काही बातम्या येतात, त्यात काही तथ्य नाही. शिंदे साहेब विभागाच्या काही महत्त्वाच्या कामासाठी दिल्लीला गेले आहेत. गेल्या आठवड्यात ते दिल्लीला गेले होते आणि आताही गेले आहेत. विधान परिषदेची चर्चा करण्यासाठी दिल्लीला जाणे हे मनाला पटणारं नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

### उष्माघाताने गेल्या ४८ तासात....

ऑरेंज कलर दिला होता. त्यामुळे या संपूर्ण आठवडा यवतमाळकरांना सोसावा लागणार आहे. पुढील काही दिवस असे तापमान राहणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. नागरिकांनी उन्हात बाहेर पडू नये. शारीरिक श्रमाची कामे करू नये. मे महिन्यातील हा आठवडा सर्वाधिक उष्णतेचा ठरला आहे. तापमान सातत्याने कमाल ४५ अंशापुढे गेले आहे. संपूर्ण विदर्भात उष्णतेची लाट कायम असून शहराप्रमाणे ग्रामीण भागाला देखील या उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे ग्रामीण भागात देखील रस्ते निर्मनुष्य झाल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

### गोदावरी नदीपात्रात बुडून दोन....

यांच्या जवानांनाही बोलावण्यात आले. गोदावरी जीव रक्षकांनी दोन्ही बालकांचा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढला. पोलिसांनी पंचनामा केल्यानंतर सदर मृतदेह शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे पाठविण्यात आले. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### बलुचिस्तानमध्ये आत्मघाती हल्ला....

बलुचिस्तानसह अनेक संवेदनशील भागांमधून जाते. अलिकडच्या वर्षांत, बलुचिस्तानमध्ये रेल्वे रुळ, सुरक्षा दल आणि सरकारी लक्ष्यांवर अनेक मोठे हल्ले झाले आहेत. ज्या भागांमधून ही रेल्वे जाते, त्या भागांमध्ये बलुच लिबरेशन आर्मीचे (बीएलए) मोठे अस्तित्व आहे, ज्यामुळे ती अनेकदा लक्ष्य बनली आहे. गेल्या वर्षी, बीएलएने जाफर एक्सप्रेसचे अपहरण केले होते. त्यावेळी, बीएलएने २१४ प्रवाशांना ओलीस ठेवण्याची आणि ३० सैनिकांना ठार मारण्याची भाषा केली होती.

### नांदेडमध्येही आयएसटी सिग्नल सिस्टीममुळे....

असलेल्या मार्गांवर वेळ कमी केला जातो. त्यामुळे अनावश्यक प्रतीक्षा टळून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर देखील या प्रणालीद्वारे लक्ष ठेवले जाते. रेड सिग्नल तोडणे, वेगमर्यादा ओलांडणे किंवा हेल्मेट नसणे, फ्रंटशिट, ट्रिपल सीट अशा प्रकारांची नोंद कॅमेऱ्यांद्वारे करून ई-चलन जारी करण्याची सुविधाही या सिस्टीममध्ये उपलब्ध आहे. मोठ्या महानगरांप्रमाणेच आता मध्यम आणि लहान शहरांमध्येही स्मार्ट ट्रॉफिक सिग्नल सिस्टम लागू करण्यावर भर दिला जात असल्याने प्रायोगीक तत्त्वावर ही सिस्टीम नांदेडच्या वजिराबाद मुख्य चौकात बसविण्यात आली आहे. येणाऱ्या काळात लवकरच चार ते पाच ठिकाणी सिस्टीम शहराच्या इतर मुख्य चौकात बसविण्यात येणार असल्याचे या सिस्टीमचे प्रमुख इंजिनीयर प्रदीप गिलबिले यांनी गोदातीर समाचारशी बोलताना सांगितले. या सिस्टीमुळे इंधन बचत, प्रदूषणात घट आणि नागरिकांचा प्रवास वेळ कमी होण्यास मदत होणार आहे. एवढेच नाही तर शहर वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यावरील ताणही कमी होणार असून या ठिकाणी कर्मचारी कर्तव्यावर नसला तरीही सिस्टीम काम करणार असल्याचे सपोनि. नागरगोजे यांनी सांगितले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com